शुक्रवार, 02 सप्टेंबर 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी ● दैनिक
वर्ष - 02 ● अंक - 35
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● FRIDAY 02 SEPTEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-35 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5


## पंतप्रधानपदासाठी नितीशकुमारांना पाठिंबा

आधुनिक केसरी न्यूज



**पाटणा :** लोकसभा निवडणुकीला आता दोन वर्षांपेक्षा कमी कालावधी राहिला आहे. भाजपने आतापासून मिशन लोकसभा सुरु केले आहे. महाराष्ट्रात सत्तापालट करण्यात यशस्वी झालेल्या भाजपला बिहारमध्ये मोठा धक्का बसला होता. मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी भाजपसोबतची युती तोडून राजद आणि काँग्रेसच्या साथीने नवे सरकार स्थापन केले. नितीशकुमार यांनी भाजपची साथ सोडताच ते २०२४ लोकसभा निवडणुकीसाठी पंतप्रधान पदाचे उमेदवार असतील अशा चर्चा सुरु झाल्या आहेत. मात्र, नितीश कुमारांनी अद्याप भूमिका स्पष्ट केलेली नाही. नितीशकुमार यांच्या सरकारमध्ये सहभागी असलेल्या हम पार्टीने आज मोठी घोषणा केली आहे. माजी मुख्यमंत्री जीतनराम मांझी यांच्या हिंदुस्तानी आवाम मोर्चा या पार्टीने नितीशकुमार हे आगामी लोकसभा निवडणुकीसाठी पंतप्रधानपदाचे उमेदवार असतील, अश घोषणा केली आहे.

# स्वाक्षरी करणाराच जबाबदार

## चेक बाऊन्स प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : चेकवर जो स्वाक्षरी करतो आणि पैसे देणाऱ्याला देतो तो जबाबदार असल्याचे गृहित धरले जात असल्याचे सुप्रीम कोर्टाने नमूद केले आहे. दुसऱ्या व्यक्तीने तपशील भरला तरीही चेक ड्रॉवर (चेक देणारा ज्याचे अकाउंट आहे) जबाबदार असतो, असे सर्वोच्च न्यायालयाने निरीक्षण केले आहे.**

सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले की धनादेशावर स्वाक्षरी करणारा आणि प्राप्तकर्त्याला देतो तो धनादेश कर्जाच्या पेमेंटसाठी किंवा दायित्वाच्या सुटकेसाठी जारी करण्यात आला होता हे सिद्ध होत नाही तोपर्यंत तो जबाबदार मानला जातो. अशा निर्धारासाठी, धनादेशातील तपशील ड्रॉवरने नाही तर इतर एखाद्या व्यक्तीने भरला आहे हे तथ्यहीन असेल, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. त्यात असे जोडण्यात आले आहे की हे तपशील ड्रॉवरने भरले आहेत की नाही किंवा धनादेश कर्जाच्या किंवा दायित्वाच्या भरपाईसाठी जारी केला गेला आहे की नाही. याविषयी हस्तलेखन तज्ज्ञांच्या अहवालात संरक्षणाची भूमिका नाही.

### दंडात्मक गुन्हा

चेक बाऊन्स होणे गुन्हा मानला जातो. गुन्ह्यासाठी दंडाची रक्कम वसूल केली जाते. चेकद्वारे पैसे दिल्यास चेक बँकेत जमा करण्यापूर्वी त्या व्यक्तीशी खात्यात पुरेसे पैसे असल्याची खात्री करून घ्यावी. चेक बाऊन्स झाल्यास तुम्हाला एक महिन्यात पैसे देणे बंधनकारक आहे. अन्यथा संबंधित व्यक्तीला कायदेशीर नोटीस दिली जाते. चेक बाऊन्समधील व्यवहारानंतर देय रक्कम न मिळाल्यास कलम 138 अन्वये गुन्हा दाखल केला जाऊ शकतो. चेक मिळाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत तुमच्या खात्यात जमा करा. कोणत्याही प्रकारच्या चेकची वैधता तीन महिने असते.

### चेक बाऊन्स का होतो?

जेव्हा चेक बाऊन्स होतो. तेव्हा तुम्हाला बँककडून पावती दिली जाते. पावतीत चेक बाऊन्स होण्याचे कारण स्पष्टपणे नमूद असते. तुमचा कोणताही चेक बाऊन्स झाला असल्यास तुम्ही कर्जदाराला 30 दिवसांच्या आत नोटीस पाठवायला हवी. नोटीस देऊनही तीस दिवसांच्या आत उत्तर न मिळाल्यास तुम्ही व्यक्तीविरुद्ध थेट गुन्हा नोंद करू शकतात.

### महत्त्वाची बातमी

## नौदलात आज दाखल होणार विमानवाहू युद्धनौका




आधुनिक केसरी न्यूज

**कोच्ची :** भारतीय नौदलाच्या ताफ्यात पहिली स्वदेशी विमानवाहू युद्धनौका 'INS विक्रांत' उद्या म्हणजेच 2 सप्टेंबर रोजी दाखल होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः ही विमानवाहू नौका नौदलाच्या सेवेसाठी सुपूर्द करणार आहेत. विक्रांत ही भारतातील सर्वात मोठी युद्धनौका असून, नौदलात याचा समावेश केल्याने भारताचा समावेशदेखील स्वतःची विमानवाहू युद्धनौका तयार करण्याची क्षमता असलेल्या देशांच्या निवडक यादीत सामील होणार आहे. आज आपण याच याची वैशिष्ट्य जाणून घेणार आहोत.
पहिली गोष्ट म्हणजे भारतीय बनावटीच्या INS विक्रांतमध्ये वापरल्या जाणाऱ्या सर्व वस्तू स्वदेशी नाहीत. म्हणजेच यात वापरण्यात आलेले काही भाग परदेशातूनही आयात करण्यात आलेले आहेत. मात्र, यात वापरण्यात आलेले 76 टक्के भाग हे देशातील उपलब्ध संसाधनांचा वापर करून बनवण्यात आल्याचे नौदलाने म्हटले आहे. विक्रांतच्या बांधणीसाठी लागणारे युद्धनौकेचे स्टील भारतीय पोलाद प्राधिकरणाने तयार केले आहे. हे पोलाद तयार करण्यासाठी भारतीय नौदल आणि संरक्षण संशोधन आणि विकास प्रयोगशाळेची मदतही घेण्यात आली आहे. नौदलाच्या म्हणण्यानुसार या युद्धनौकेच्या बांधणीसाठी वापरण्यात आलेल्या स्वदेशी गोष्टींमध्ये स्टील, 2500 किमीची इलेक्ट्रिक केबल, 150 किमीचे पाइप आणि 2 हजार व्हॉल्व्ह यांचा समावेश आहे.

# मंत्रिपदाचा फॉर्म्युला ठरला पण मंत्रिमंडळाचा दुसरा विस्तार लांबला?

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात सत्तांतर झाल्यानंतर ३० जून मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीसांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. मात्र त्यानंतर महिनाभराने शिंदे-फडणवीस सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार पार पडला. या मंत्रिमंडळ विस्तारात १८ जणांना मंत्रिपदाची शपथ देण्यात आली. यात प्रामुख्याने शिंदे गट आणि भाजपाकडून प्रत्येकी ९ जणांना समावेश करण्यात आला होता.
मंत्रिमंडळाच्या पहिल्या विस्तारात अपक्ष, मित्रपक्षांना सामावून घेण्यात आले नाही. तर शिंदे गटातील अनेकांना यादीत स्थान नसल्याने नाराजी व्यक्त केली होती. अशातच दुसऱ्या विस्तारात स्थान दिले जाईल असे आश्वासन शिंदेंनी नाराज आमदारांना दिले. राज्यातील गणेशोत्सव संपल्यानंतर मंत्रिमंडळाचा दुसरा विस्तार होईल असे सांगण्यात येत होते. परंतु आता हा विस्तार दिवाळीपूर्वी होऊ शकतो असे म्हटले आहे. त्यामुळे मंत्रिपदाची आस लावलेल्यांना आणखी काही दिवस वेटिंग लिस्टवर राहावे लागणार आहे.
सूत्रांनुसार, दुसऱ्या टप्प्यात २४ मंत्र्यांचा शपथविधी पार पडणार आहे. त्यात ७ कॅबिनेट आणि १७ राज्यमंत्र्यांना शपथ दिली जाईल. यात शिंदे गटाला आणखी ४ कॅबिनेट मंत्रिपदे मिळणार अशी माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे शिंदे गटातील नाराजांची दुसऱ्या कॅबिनेट विस्तारात वर्णी लागणार का हे पाहणे गरजेचे आहे. सध्या शिंदे-फडणवीस सरकारमध्ये १८ कॅबिनेट मंत्री आहेत. त्यात महत्त्वाची खाती अद्याप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी स्वतःकडे ठेवली आहेत.

### खात्यांवरूनही मंत्री नाराज?

मंत्रिमंडळ विस्तारात स्थान न मिळाल्याने शिंदे गटातील काही आमदार नाराज होते. त्यातील काहींनी उघडपणे नाराजी व्यक्त केली. त्याचसोबत खातेवाटपावरून मंत्रीही नाराज असल्याचे समोर आले होते. त्यात नाराज आमदारांवर उद्धव ठाकरे गटाचे लक्ष आहे. नाराजी कायम राहिली तर या आमदारांना पुन्हा आपल्याकडे वळवण्यासाठी उद्धव ठाकरे गट सक्रीय आहे. त्यामुळे दुसऱ्या मंत्रिमंडळ विस्तारात अत्यंत सावध पावले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना उचलावी लागतील अन्यथा आमदारांच्या नाराजीमुळे शिंदेंची डोकेदुखी वाढण्याची शक्यता आहे.

# मातोश्रीला खोके नवीन नाहीत, आम्हाला तोंड उघडायला लावू नका!

## शिंदे गटातील नेते रामदास कदम यांचा उद्धव ठाकरेंना थेट इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**रत्नागिरी :** मातोश्रीला खोके नवीन नाहीत. मातोश्रीत किती मिठाईचे खोके गेले, हे आम्हाला माहिती आहे. तसेच दसरा मेळाव्या संदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याजवळ मी बोलणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दसरा मेळावा शिवतीर्थावरच घ्यावा, हे आपलं मत आहे. बाळासाहेबांचे विचार एकनाथ शिंदे यांच्यासोबत आहेत. उद्धवजींकडे शरद पवार यांचे विचार आहेत. त्यामुळे शिवतीर्थावर दसरा मेळावा घेण्याचा अधिकार एकनाथ शिंदे यांना असल्याचे म्हणत शिंदे गटातील नेते रामदास कदम यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल केला आहे.
बाळासाहेबांच्या विचारांशी उद्धव ठाकरे यांनी गद्दारी केली आहे. त्यांनी बाळासाहेबांच्या विचाराशी पाठीत खंजीर खुपसण्याचे काम केले. त्यांना बाळासाहेबांचे नाव घेण्याचा तरी अधिकार आहे का? असा थेट सवाल रामदास कदम यांनी केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दसरा मेळावा शिवतीर्थावर घ्यावा, हे आपले मत आहे. बाळासाहेबांचे विचार एकनाथ शिंदे यांच्यासोबत आहेत. उद्धवजींकडे शरद पवार यांचे विचार आहेत. त्यामुळे शिवतीर्थावर दसरा मेळावा घेण्याचा अधिकार एकनाथ शिंदे यांना असल्याचे रामदास कदम म्हणाले. सुरवातीला त्यांनी आव्हान दिले होते, गुवाहाटीला गेलेत त्यांनी मतदारसंघात पाय ठेऊन दाखवा. नंतर म्हणाले वरळीतून जाऊन दाखवा. मग म्हणतात विधाभवनात पाऊल ठेऊन दाखवा. आता त्यांच्या नाकावर टिच्चून आमदार सगळीकडे गेले. तुमचे काय योगदान, ते फक्त आता बोलण्यापुरते आहे, असा टोला रामदास कदम यांनी लगावला.
रामदास कदम म्हणाले, स्वतःसाठी जगला तो मेला, दुसऱ्यांसाठी जगला तो खऱ्या अर्थाने जगला. असे काम मुख्यमंत्री शिंदे यांचे सुरू आहे. तातडीने निर्णय घेतले जात



आहेत. दिवसरात्रं काम करत आहेत, मंत्रालयात लोकाना भेटत आहेत. त्यांच्या निवासस्थानीदेखील नागरिकांना भेटत आहेत. तसेच, या अगोदरचे मुख्यमंत्री अडीच वर्षात केवळ तीनदा मंत्रालयात आले होते. अगदी गिनीज बुकात त्यांची नोंद झाली. मुख्यमंत्री कसा असावा, त्यांचा कामाचा सपाटा कसा असावा? हे एकनाथ शिंदेंनी दाखवून दिले आहे. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे हे दोघेहीजण अनुभवी आहेत, असेही यावेळी कदम यांनी बोलून दाखवले.

### दुसरे आश्चर्य नाही

**खोके.. खोके... खोके बोलताय. हे त्यांनी बोलावे यासारखे दुसरे आश्चर्य नाही. आतापर्यंत मातोश्रीवर किती मिठाईचे खोके गेले, याबद्दल आता आम्हाला तोंड उघडायला लावू नका, असा थेट इशाराच रामदास कदम यांनी दिला आहे. ज्याला कावीळ होते त्याला सगळे जग पिवळे दिसते. एक बोट दुसरीकडे दाखवता तेव्हा चार बोट स्वतःकडे असतात, याचे भान ठेवा, असे म्हणत माजी मंत्री रामदास कदम यांनी उद्धव ठाकरेंना जोरदार टोला लगावला आहे.**

# देशविरोधी कारवायांसाठी वापर झाल्यास मदरशे उद्ध्वस्त करू

## मुख्यमंत्री हिंमता बिस्वा सरमा यांचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**गुवाहाटी :** देशविरोधी कारवायांसाठी जर मदरशांचा वापर होत असेल तर ते उद्ध्वस्त केले जातील, असा इशारा आसामचे मुख्यमंत्री हिंमता बिस्वा सरमा यांनी दिला आहे. कथीत 'जिहादी' कारवायांसाठी वापरल्या जाणाऱ्या बोंगाईगाव इथला मदरसा बुधवारी नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल पाडण्यात आला. यानंतर सरमा यांनी हे विधान केले.
सरमा म्हणाले, मदरसे उद्ध्वस्त करण्याचा आमचा कोणताही हेतू नाही. फक्त त्यांचा वापर जिहादी घटकांकडून होत नाही ना हे तपासावे लागेल. मदरशाच्या नावाखाली त्याचा वापर भारतविरोधी कारवायांसाठी केला जात असल्याची माहिती आम्हाला मिळाली तर आम्ही ते उद्ध्वस्त करू. दहशतवादी संघटना अल कायदाशी संबंध असल्याच्या कारणावरून बोंगईगाव जिल्ह्यातील मदरसा उद्ध्वस्त करण्यात आला. अल कायदा आणि अन्सारुल बांग्ला टीम या दहशतवादी संघटनांशी संबंध असल्याबद्दल एकूण पाच जणांना यापूर्वी अटक करण्यात आली होती. पूर्वीच्या कारवाईत बारपेटा जिल्ह्यातील एका मदरशात अन्सारुल बांग्ला संघाच्या दोन बांगलादेशी कार्यकर्त्यांना चार वर्षांपासून आश्रय देण्यात आला होता.
बोंगईगावच्या पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले की, गोलपारा पोलिसांनी मंगळवारी रात्री केलेल्या कारवाईत मदरशाच्या कॅन्टीनमधून 'जिहादी' घटकांशी संबंधित कागदपत्रे जप्त करण्यात आली होती. गोलपारा पोलिसांनी गेल्या आठवड्यात मदरशाच्या एका शिक्षकाला अटक केली, त्याने दिलेल्या माहितीच्या आधारे हा छापा टाकण्यात आला होता. यावर्षी मार्चपासून राज्यात बांगलादेशींसह 'जिहादी' कारवायांशी संबंध असलेल्या ४० हून अधिक लोकांना अटक करण्यात आली आहे.



आधुनिक केसरी
फेसबुक लाईव्ह
मराठा आरक्षण महाचर्चा
सहभाग



राजेंद्र दाते पाटील
ज्येष्ठ अभ्यासक




विनोद पाटील
याचिकाकर्ते



जे. के. जाधव
ज्येष्ठ अभ्यासक

शुक्रवार, दिनांक : ०२/०९/२०२२ वेळ : दुपारी ४ ते ५




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## गणेशोत्सवाच्या निमित्ताने...

आधुनिक केसरी

आजच्या घडीला श्री गणेश ही बहुधा सर्वात लोकप्रिय देवता असावी. परंतु आदी शंकराचार्यांनी श्री गणेशाचा समावेश पाच प्रमुख देवतात केल्यामुळे दिवसेंदिवस गणपतीची लोकप्रियता वाढू लागली. गणपतीची उपासना करणाऱ्यांचा गाणपत्य संप्रदाय निर्माण झाला. पुण्याजवळील चिंचवडचे मोरया गोसावी हे गाणपत्य संप्रदायातील प्रमुख उपासक मानले जातात. श्री गणेशाची माहिती तशी अनेक पुराणातून आलेली असली तरी गणपतीशी किंवा गाणपत्य संप्रदायाशी संबंधित दोन प्रमुख ग्रंथ मानले जातात. श्री गणेशपुराण व मुद्गलपुराण. गणेशपुराणात गणपतीच्या कथा व पूजेच्या पद्धतींची



माहिती आलेली आहे. प्रसिद्ध गणेश सहस्त्रनाम स्तोत्र आणि गणेश गीता यांचा समावेश गणेश पुराणात झालेला आहे. मुद्गल पुराणात गणपतीच्या आठ अवतारांचे वर्णन आले आहे.
गणपती हा विघ्नहर्ता म्हणून प्रामुख्याने आपल्याला परिचित आहे. म्हणून महाराष्ट्रातल्या बहुतेक मराठी माणसांच्या घरांच्या दरांवर श्रीगणेशाची प्रतिमा असते. गणपती हा विघ्नहर्ता असल्याने घरावर येणाऱ्या संकटाचे निवारण तो करेल अशी घरातील लोकांची श्रद्धा असते.
गणपतीच्या जन्मासंबंधाने वेगवेगळ्या पौराणिक कथा प्रचलित आहेत. त्या येथे सांगण्याचे प्रयोजन नाही. पण त्यामागील प्रतिकात्मक अर्थ पाहणे महत्वाचे. असे म्हणतात की पार्वतीने आपल्या अंगावरील मळ काढून एक मूर्ती बनवली आणि त्यात प्राण फुंकले. तो तिचा पुत्र बनला. त्याचे स्वरूप अत्यंत सुंदर होते. या ठिकाणी पार्वतीने आपल्या अंगाचा मळ काढून त्याला सजीवरूप दिले ही गोष्ट आपल्याला ऐकायला विचित्र वाटते. आणि आजच्या विज्ञानयुगात आपण ती हसून सोडून देऊ. पण त्याचा प्रतीकात्मक अर्थ असा आहे की पार्वतीने आपल्या अंगाचा मळ काढून टाकला याचा अर्थ सत्व, रज, तम या त्रिगुणांचा तिने त्याग केला. मनातील विकार नाहीसे केले. आणि असे जेव्हा होते मन आणि शरीर शुद्धी होते. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

### भीतीयुक्त आदर मिळवू नये

आधुनिक केसरी

जगाच्या पाठीवर कोणत्याही प्रांतात आपण गेलो तर, आपल्याला नव्याने भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला नमस्कार करण्याची पारंपारिक प्रथा सर्वत्र आहे. वडिलधाऱ्या व्यक्तींना नमस्कार करणे हा आदराचा भाग झाला, परंतू तो नमस्कार जेव्हा भीतीयुक्त असतो, तेव्हा मात्र त्यांतून नेमके काय साध्य होत असते, हेच उमगत नाही. काहीवेळा एखाद्या व्यक्तीला अव्हेरून, टाळून चालत नाही; पर्याय नाही म्हणून देखील नमस्कार करावा लागत असतो. तर काहीवेळा, तो भीतीपोटी देखील करावा लागतो.
खरे तर, भीतीयुक्त आदर आणि त्यासाठी केला जाणारा नमस्कार, जी व्यक्ती तो करून घेते त्या व्यक्तीला देखील का बरे तो इतका प्रतिष्ठेचा, महत्वाचा, मोलाचा वाटत असतो? त्याची त्यांना काही जाणीवच होत नसते का? कि केवळ स्वतःच्या प्रतिष्ठेसाठी आणि मोठेपणासाठी तो करून घेतला जात असतो. काही घरांमध्ये अजूनही आणि आजही वडिलकीच्या पिढीमध्ये भीतीयुक्त आदर जपल्याचे दिसून येते. वातावरण म्हणावे तितके मोकळे नसते. एकप्रकारचा तणाव, दबाव आणि भीती, त्यांतूनच मनांत सतत दडपण निर्माण करणारे काही सदस्य एखाद्या कुटुंबात असतात.
त्यांचा आदर करणे, त्यांचा मान राखणे हे नव्या पिढीसाठी आव्हानच असते. त्या भीतीयुक्त आदरामुळे केलेला नमस्कार खरेच काही साध्य करत असेल का? सरकारी अधिकारी अथवा कर्मचारी आपल्या कामाबद्दल संपर्कांत येतात अथवा त्यांना संपर्क करावा लागतो, तेव्हा देखील अनेकदा त्यांना सक्तीचा रामराम करावा लागतो. त्यांना देखील नमस्कार आदरानेच मिळावा असे का वाटत नाही? नमस्कारापेक्षा तिरस्कार होण्याची वेळ त्यांच्याबाबतीत का बरे येते?



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### तोचि स्थिरावला | ब्रह्मानंदी ||

ज्याचे त्याचे भाग्य | लाभतो विलास ||
कोणाच्या वाट्यास | क्लेश येतो ||१||

कोणी विकारात | गुंते रात्रंदिन ||
तया कैसे भान | पाप-पुण्य ||२||

कर्म फळासाठी | आशेने राबतो ||
गुंतूनीया जातो | जन्मभर ||३||

मनाच्या मंदिरी | ज्याच्या वाजे टाळ ||
भाग्यवान बाळ | विठ्ठलाचा ||४||

जगाच्या बाजारी | विरक्त जगला ||
तोचि स्थिरावला | ब्रह्मानंदी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## “निरुपण”

आधुनिक केसरी

**श्रुत्यै नमोऽस्तु शुभकर्मफलप्रसूत्यै**
**रत्यै नमोऽस्तु रमणीयगुणार्णवायै ।**
**शक्त्यै नमोऽस्तु शतपत्रनिकेतनायै**
**पुष्ट्यै नमोऽस्तु पुरुषोत्तमवल्लभायै ॥११॥**
हे माते, शुभ कर्मांचे फळ देणाऱ्या श्रुती रूपात तुला प्रणाम आहे. रमणीय गुणांच्या निधी अशा रतीच्या रूपात तुला नमस्कार आहे. कमलवनात निवास करणाऱ्या शक्तिस्वरूपा लक्ष्मीला नमस्कार आहे. पुरुषोत्तमप्रिया पुष्टीला नमस्कार आहे.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ऋषीपंचमी व्रत

आधुनिक केसरी

गणेश चतुर्थीनंतर भाद्रपद शुक्ल पंचमीला येणारे हे ऋषीपंचमी व्रत घराघरातील स्त्रिया करताना दिसतात. शास्त्र, पूराणात या व्रताचे फार महत्व सांगितले आहे. मासिक धर्मात स्त्रियाकडून होणाऱ्या चुकाना माफ़ी मिळावी म्हणून हे व्रत केले जाते. पूर्वीच्या स्त्रिया मासिक धर्मात तेवढे दिवस बाजूला बसत असत. स्वयंपाक घरात येण्याची परवानगीसुद्धा त्या स्त्रियाना नसायची, पण काळानुसार सर्व बदलत गेलं, आता घरात काम करायला कोणी नसल्यामुळे म्हणजे नाईलाजास्तव घरातल्या स्त्रीला मासिक धर्मात स्वयंपाक करून घरातील व्यक्तीना खाऊ घालावा लागतो. तिच्या हातून होणाऱ्या या चूका तिला माफ व्हाव्यात म्हणून ऋषीपंचमी व्रत करतात. हे व्रत शाक्यतो पन्नास वर्ष वयातील महिलानी करावे. कारण या व्रताचा नियम असा आहे, ज्या स्त्रीला मासिक धर्म येत असेल ती हे व्रत करू शकत नाही. जर तिने हे व्रत केले आणि व्रताच्या दिवशी तिला मासिक धर्म आला तर ऋषि मारतात आणि ते पाप तिच्या नावे येते.म्हणून तिने हे व्रत न केलेले चांगले, पण आणि पन्नाशी उलटली की मासिक धर्म येत नाही. आता तर कुमारीकासुद्धा हे ऋषिपंचमी व्रत करताना आपल्याला आढळतात. पूर्वीच्या स्त्रिया ऋषिपंचमी व्रतदिनी सकाळी लवकर उठून ज्या ठिकाणी सप्तऋषिचे मंदिर आहे त्या तीर्थ क्षेत्री जाऊन नदीवर स्नान करायच्या. आघाड्याच्या काड्यांनी दात घासत. काळी माती अंगाला लावायला वापरत आणि केस धुवायला गाईचे गोमत्र लावत. त्यानंतर आंघोळ करून नवीन पांढरी शुभ्र साड़ी घालून सप्तऋषिची मनोभावे पूर्ण श्रद्धापूर्वक पूजा करून दिवसभर उपवास करुन फक्त दूध घेऊन आणि ते दूध पण बांधून न ठेवलेल्या म्हशीचे दूध काढून या व्रतला चालते. संध्याकाळी पण फक्त दूधच घ्यायचे आणि दुसऱ्या दिवशी सकाळी हे व्रत उपवास सोडून पूर्ण करावे लागते.



कविता चव्हाण
संपर्क क्र. 9370062031

## श्री गणेश चतुर्थीस आचरण्यात येणाऱ्या व्रताविषयीचे शास्त्र !



आधुनिक केसरी न्यूज

प्रस्तावना : श्री गणेशचतुर्थी हा हिंदूंचा मोठा सण आहे. श्री गणेश चतुर्थीला, तसेच श्री गणेशोत्सवाच्या दिवसांत गणेशतत्त्व नेहमीच्या तुलनेत पृथ्वीवर 1 सहस्र पटीने कार्यरत असते. या काळात केलेल्या श्री गणेशाच्या उपासनेने गणेशतत्त्वाचा अधिक लाभ होतो. सुखकर्ता, विघ्नहर्ता आणि अष्टदिशांचा अधिपती असलेल्या श्री गणेशाची पूजा भावपूर्ण होऊन त्याचा कृपाशीर्वाद मिळावा, असाच सर्व गणेशभक्तांचा प्रयत्न असतो. श्री गणेश चतुर्थीस आचरण्यात येणाऱ्या व्रताविषयीचे शास्त्र या लेखातून समजून घेऊया. श्री गणेश चतुर्थी निमित्त नवीन मूर्तीचे प्रयोजन, श्री गणेश चतुर्थीला पुजावयाची मूर्ती कशी असावी आणि ही शास्त्रोक्त पद्धतीने ही मूर्ती घरी कशी आणावी ? श्री गणेश चतुर्थी या दिवशी चंद्रदर्शन करणे वर्ज्य असणे यांमागील कारण अशा अनेक प्रश्नांची उत्तरे या लेखात मिळतील.
श्री गणेश चतुर्थीस आचरण्यात येणारे व्रत : श्री गणेश चतुर्थीस आचरण्यात येणारे व्रत हे सिद्धीविनायक व्रत या नावाने ओळखले जाते. वास्तविक हे व्रत सर्व कुटुंबांत होणे क्रमप्राप्त आहे. सर्व भाऊ एकत्र रहात असतील म्हणजेच त्यांचा द्रव्यकोश (खजिना) आणि पाकनिष्पत्ती (चूल) एकत्र असेल, तर सर्वांत मिळून एक मूर्ती पुजली तरी चालते; पण ज्या वेळी द्रव्यकोश आणि पाकनिष्पत्ती कोणत्याही कारणास्तव विभक्त असतील, तर त्यांनी आपापल्या घरी स्वतंत्र गणेशमूर्ती पुजावी. ज्या कुटुंबात एकच गणपति बसवण्याची दृढ परंपरा आहे, त्या कुटुंबात ज्या भावामध्ये देवाविषयी अधिक भाव आहे, त्याच्याच घरी गणपति बसवावा.
नवीन मूर्तीचे प्रयोजन : पूजेत गणपति असला, तरी गणपतीची नवीन मूर्ती आणावी. श्री गणेश चतुर्थीच्या वेळी गणेशलहरी पृथ्वीवर खूप जास्त प्रमाणात येतात. त्यांचे आवाहन नेहमीच्या पूजेतील मूर्तीत केल्यास तिच्यात खूप जास्त शक्ती येईल. जास्त शक्ती असलेल्या मूर्तीची साग्रसंगीत पूजाअर्चा वर्षभर नीटपणे करणे कठीण जाते; कारण त्यासाठी कर्मकांडातील बंधने पाळावी लागतात. म्हणून गणेशलहरींचे आवाहन करण्यासाठी नवीन मूर्ती वापरतात आणि ती मूर्ती नंतर विसर्जित करतात.
श्री गणेश चतुर्थीला पुजावयाची मूर्ती कशी असावी ? : चिकणमाती किंवा शाडूची माती यांपासून मूर्ती बनवावी, असा शास्त्रविधी आहे. अन्य वस्तूंपासून (उदा. प्लास्टर ऑफ पॅरिस, कागदाचा लगदा) मूर्ती बनवणे, हे धर्मशास्त्रविरोधी, तसेच पर्यावरणाला घातक आहे. मूर्तीची उंची अधिकाधिक एक फूट ते दीड फूट असावी. मूर्ती शास्त्रानुसार बनवलेली, पाटावर बसलेली, डाव्या सोंडेची अन् नैसर्गिक रंगांनी रंगवलेली असावी. परंपरा किंवा आवड यांप्रमाणे गणेशमूर्ती आणण्यापेक्षा धर्मशास्त्रसंमत गणेशमूर्ती पुजावी.
शास्त्रोक्त विधी आणि रूढी यांचा अवधी : भाद्रपद शुद्ध चतुर्थीस मातीचा गणपति करतात. तो डाव्या हातावर ठेवून तेथेच त्याची सिद्धीविनायक या नावाने प्राणप्रतिष्ठा आणि पूजा करून लगेच विसर्जन करावे, असा शास्त्रविधी आहे; पण मनुष्य हा उत्सवप्रिय असल्याने एवढ्याने त्याचे समाधान होईना; म्हणून दीड, पाच, सात किंवा दहा दिवस श्री गणपति ठेवून त्याचा उत्सव करू लागला. बरेच जण (ज्येष्ठा) गौरीबरोबर गणपतीचे विसर्जन करतात. एखाद्याच्या कुलाचारात गणपति पाच दिवस असेल आणि तो त्याला दीड किंवा सात दिवसांचा करावयाचा असला, तर तो तसे करू शकतो. यासाठी अधिकारी व्यक्तीस विचारण्याची जरूरी नाही. रूढीप्रमाणे पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या, सहाव्या, सातव्या किंवा दहाव्या दिवशी श्री गणेशविसर्जन करावे.
मूर्तीची आसनावर स्थापना : पूजेपूर्वी ज्या पाटावर मूर्तीची स्थापना करायची असते, त्यावर तांदूळ (धान्य) ठेवून त्यावर मूर्ती ठेवतात. आपापल्या प्रथेप्रमाणे थोडे तांदूळ किंवा तांदुळाचा लहानसा ढीग करतात. **(उर्वरित उद्याच्या अंकात)**

दत्तात्रेय वाघूळदे
संपर्क क्र 9284027180





जे. के. जाधव
अध्यक्ष

विक्रांत जाधव
सहसचिव

# भारतीय ग्रामीण पुनर्रचना संस्था अंतर्गत पुढील अभ्यासक्रमासाठी

## प्रवेश देणे सुरु आहे

MBA, MCA, Diploma, Degree in Engineering, D. Pharmacy, B. Pharmacy, GD Art, BFA, MFA, B.A., B.Com, Bsc., M.A., M.Sc., D.Ed., B.Ed., etc..

संपर्क

जे.के. नॉलेज सेंटर राजर्षी शाहु इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट, पी.७५, गरवारे पॉलिस्टरच्या मागे, एम.आय.डी.सी., चिकलठाणा, औरंगाबाद.
डॉ. एजाज कुरेशी मो. ९८२२०५५७६४

जे.के. नॉलेज सेंटर नाडकर्णी पार्क, एम.बी.पी.टी. हॉस्पिटलमागे, वडाळा (पूर्व) मुंबई-४०००३७.
सुनिल वाघ मो. ९७६७८८७०२०

# दुष्काळाची परिस्थिती गंभीर

आधुनिक केसरी

**अमेरिकेला पाणीपुरवठा करणाऱ्या मोठ्या धरणांनी तळ गाठला असून तेथे १९३७ नंतरची सर्वांत भीषण टंचाई निर्माण झाली आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम आणि अमेरिकेच्या नॅशनल एरोनॉटिक अॅन्ड स्पेस अॅडमिस्ट्रेशनने (नासा) जाहीर केलेल्या माहितीनुसार, अमेरिकेतील सुमारे २.५ कोटी लोकांना पाण्याचा पुरवठा करणाऱ्या लेक मीड या जलाशयाने तळ गाठला आहे, अशी स्थिती १९३७ नंतर प्रथमच निर्माण झाली आहे. कमी पाऊस आणि उष्णतेच्या लाटांमुळे अमेरिकेतील दुष्काळाची तीव्रता वाढत आहे. अमेरिकेच्या कॅलिफोर्निया, टेक्सास, ओरेगॉन, नेवाडा, युटा आणि न्यू मेक्सिको या राज्यांमध्ये दुष्काळाची परिस्थिती सर्वांत गंभीर आहे. अमेरिकेच्या कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, दुष्काळाचा अमेरिकेच्या कृषी आणि पशुधनावर विपरित परिणाम होणार आहे. दुष्काळ आणि उष्णतेच्या लाटेमुळे गवतांच्या कुरणांचे मोठे नुकसान झाल्यामुळे पशुधनाचे उत्पादन कमी होऊ शकते. शेतीच्या उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. याचा परिणाम स्थानिक, प्रादेशिक आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थांमध्ये दिसून येणार आहे. अन्न प्रक्रिया आणि कृषी सेवा क्षेत्रांवर नकारात्मक परिणाम होऊन प्रादेशिक आणि राष्ट्रीय स्तरावर अन्नाच्या किमती वाढू शकतात. अमेरिकेत उत्पादित होणाऱ्या कापूस, गहू, मका आदी पिकांचे उत्पादन घटणार आहे. युरोपीय कमिशनने युरोपातील दुष्काळ ऑगस्ट २०२२, या नावाने प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटले आहे, की युरोपातील अनेक देशांना वर्षाच्या सुरुवातीपासून दुष्काळाच्या झळा बसत आहेत. जुलै, ऑगस्ट महिन्यात या झळा अधिक तीव्र झाल्या आहेत. उष्णतेच्या लाटा या दुष्काळात भर टाकत आहेत. संपूर्ण युरोपातील नद्यांची पातळी घटली आहे, अनेक नद्या कोरड्या पडल्या आहेत. पिण्याचे पाणी, शेतीसाठीचे पाणी आणि जलविद्युत क्षेत्रावर मोठा परिणाम झाला आहे. अन्नधान्यांसह मका, सोयाबीन आणि सूर्यफुलांच्या उत्पादनावर मोठा परिणाम होणार आहे. पुढील तीन महिने नेहमीच्या परिस्थितीपेक्षा कोरड्या हवामानाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. बीबीसी, सीएनबीसी या वृत्तवाहिन्यांसह अनेक संस्था हा पाचशे वर्षांतील सर्वांत भीषण दुष्काळ असल्याचे सांगत आहेत. जर्मनी, नेदरलँड्स आणि स्वित्झर्लंड या देशांची अर्थवाहिनी असलेली ऱ्हाईन नदी आणि मध्य युरोपातून काळ्या समुद्रापर्यंत वाहणारी डॅन्यूब, ओडर, लोरी, पो, वाल या प्रमुख नद्यांसह युरोपातील अनेक नद्या कोरड्या पडल्या आहे. युरोपातील नद्यांवर अवलंबून असलेली ८० अब्ज डॉलर्सची अर्थव्यवस्था थंडावली आहे. संपूर्ण युरोपात आगामी वर्षात अन्नधान्यांची टंचाई निर्माण होणार आहे. जगातील मोठ्या लोकसंख्येला उपासमारीचा, कुपोषणाचा सामना करावा लागू शकतो. 'द गार्डियन'ने दुष्काळामुळे आफ्रिकेतील २.२ कोटी लोक आजघडीला उपासमारीच्या उंबरठ्यावर असल्याचे म्हटले आहे. ही उपासमारीची समस्या आणखी उग्र होण्याचा धोका आहे.**

# देशाला पोखरतेय ड्रग्जची वाळवी



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**आधुनिक तंत्राचा अवलंब करून तस्कर कायदा व सुव्यवस्थेच्या डोळ्यात धूळफेक करू शकतात. अशा स्थितीत सायबर आघाडीवर अंकुश ठेवण्यासाठी सरकारी यंत्रणांना प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करावा लागणार आहे. मात्र, जोपर्यंत समाज त्याच्या प्रतिबंधात सक्रियता दाखवत नाही तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही. अंमली पदार्थांचे सेवन ही एक सामाजिक समस्या आहे. यातील गंभीर बाजू म्हणजे पारंपारिक कौटुंबिक संरचनेचे विकेंद्रीकरण, स्वच्छंद जीवनशैली, सामाजिक अलिप्तता इत्यादीमुळे आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत असल्यामुळे ही समस्या गंभीर होत चालली आहे.**

एखादा समाज आणि देश जर आतून पोकरायचा असेल तर तिच्या युवाशक्तीला अंमलीपदार्थांच्या गर्तेत अडकवणं पुरेसं आहे. बाकी फारसं काही करावं लागत नाही. अलीकडच्या काळात देशाच्या विविध भागात पोलिसांचा अंमली पदार्थांच्या साठ्यावर छापा, जप्तीच्या बातम्या आणि या अंमली पदार्थांच्या पुरवठ्याचा मार्गक्रम अशा या सगळ्या बाबींवर नजर टाकली, तर अंमली पदार्थांच्या विळख्यात सापडलेली आपली तरुण पिढी अशाच चक्रव्यूहात फसत चालली असल्याचं दिसत आहे.या प्रकरणावर बारकाईने नजर ठेवल्याने देशात अमली पदार्थांचे मोठे साठे पकडले जात आहेत. एवढेच नाही, तर या नेटवर्कमध्ये कोण कोण सामील आहेत, ड्रग्ज कुठून कुठून आणि कसे येत आहेत या गोष्टी तपासल्यावर ही बाब मोठी गंभीर असल्याचे दिसत आहे. आपल्या देशाच्या कोणत्या भागात आणि समाजातील कोणत्या घटकांमध्ये इतका प्रचंड वापर होत आहे,याचाही अंदाज येत आहे.

देशाच्या विविध भागांतून अमली पदार्थ पकडण्याच्या घटनांमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे. नुकतेच, मुंबईच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने (अँटी नार्कोटिक्स सेल) गुजरातच्या भरूच जिल्ह्यातील अंकलेश्वर येथे एका अंमली पदार्थांच्या कारखान्याचा पर्दाफाश केला आणि एक हजार कोटींहून अधिक किमतीच्या पाचशे तेरा किलो अमली पदार्थांच्या साठयांच्या जप्तीसह सात जणांना अटक केली. 3 ऑगस्ट रोजी मुंबईतील नालासोपारा येथून 14 अब्ज रुपयांचे मेफेड्रान-एमडी हे ड्रग्ज पकडण्यात आले होते. ही खेप उच्चवर्गीय तरुणांना विकली जात असल्याची माहिती मिळाली. इतकेच नाही तर या ड्रग्ज रॅकेटमध्ये सामील असलेले लोक सोशल मीडिया आणि इतर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व्यवसायासाठी करत आहेत, जेणेकरून त्यांना सहज पकडता येणार नाही. अंमली पदार्थांचा हा पुरवठा देशाबाहेरील अनेक अड्ड्यांवरून होत असल्याचेही आढळून आलं आहे. गुजरातमधील मुंद्रा आणि पिपावा यांसारखी खासगी बंदरे देशाबाहेरून अंमली पदार्थांच्या व्यापारासाठी प्रवेशद्वार बनली आहेत. उल्लेखनीय हे की 2017 ते 2020 या वर्षात गुजरातमध्ये 2.5 लाख कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आलं आहे. याचा अर्थ हा अंमली पदार्थांचा बेकायदा व्यापार किती मोठ्या प्रमाणात देशात पसरला आहे, याची प्रचिती येते. पोलीस किंवा विशेष पथकांनी पकडलेले हे आकडे आहेत. मग हाताला न लागलेले अंमली पदार्थ अजून कुठे कुठे आणि कसे पोहचत असतील, हे सांगणे अवघड आहे. हे सगळं भयानक आहे. कदाचित याचे एकमेव कारण असे की या व्यापारात गुंतलेल्या लोकांना एकप्रकारे राजकीय आश्रय आहे आणि त्यामुळे या अवैध धंद्यात गुंतलेल्या खऱ्या गुन्हेगारांना पकडण्यात पोलीस आणि केंद्रीय यंत्रणा कचरतात.

विशेष म्हणजे या अंमली पदार्थांच्या तस्करीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे आणि हे मोठे चिंतेचे कारण आहे. हा नार्को दहशतवादाचा प्रकार आहे ज्याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. 2019 मध्ये अटारी-वाघा सीमेवर 500 किलोपेक्षा जास्त हेरॉईन पकडल्याच्या दोन वर्षांनंतर, गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये गुजरात किनाऱ्यावरील पाकिस्तानी बोटीतून 77 किलो हेरॉईन जप्त केल्याने सीमेवरील कडक सुरक्षेत वाढ होईल असे सूचित केले गेले होते. वास्तविक दहशतवादी शस्त्रे मिळविण्यासाठी आणि दारूगोळा गोळा करण्यात मदत करण्यासाठी ड्रग्सचा वापर केला जात आहे.ड्रोनचा वापर भारतीय हद्दीत अंमली



पदार्थांची खेप पोहोचवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर करण्यात आल्याचेही पुरावे मिळाले आहेत. सप्टेंबर 2020 मध्ये गुजरातमधील कच्छ भागातील मुंद्रा बंदरात सुमारे तीन हजार किलो हेरॉईन जप्त केल्याने देश हादरला होता. त्यातून ड्रग्जच्या तस्करीसाठी सागरी मार्गांचाही सातत्याने वापर होत असल्याचे उघड झाले.ही खेप अफगाणिस्तानातून इराणमार्गे भारतात पाठवण्यात आली, यावरून नव्या पिढीचा मार्ग भ्रष्ट करण्याचे आंतरराष्ट्रीय षडयंत्र कसे रचले जात आहे, हे दिसून येते. प्रत्यक्षात अंमली पदार्थांची तस्करी करण्याचा मार्ग अवलंबला जात असल्याने त्याचा पुरवठा रोखणे कठीण झाले आहे. उदाहरणार्थ, कच्छमधील मुंद्रा बंदरात तीन हजार किलो हेरॉईन इराणी टॅल्कम पावडरच्या स्वरूपात सापडले.

एकवीस हजार कोटी रुपयांची ही खेप आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील सर्वात मोठी जप्ती असल्याचे सांगण्यात आले. 2021 मध्ये अंमली पदार्थांच्या जप्तीच्या आकडेवारीचा तुलनात्मक अभ्यास दर्शवितो की पहिल्या संपूर्ण वर्षात तपास यंत्रणांनी पकडलेल्या ड्रग्जच्या खेपांची एकूण वार्षिक जप्ती अडीच हजार किलोपर्यंत होती, परंतु मुंद्रा बंदरातील एकावेळी तीन हजार किलो हेरॉईनची देशात आवक हे सूचित करते की एकतर देशात त्याचा वापर अनेक पटींनी वाढला आहे किंवा भारत हे अमली पदार्थांच्या पुरवठ्याच्या जाळ्याचे प्रमुख केंद्र बनले आहे. दोन्ही प्रकरणांमध्ये परिस्थिती चिंताजनक आहे. अशा प्रकारची धरपकड एकट्या गुजरातमध्ये झालेली नाही, तर महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, पंजाब, तेलंगणा, तामिळनाडू, राजस्थान आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या अनेक मोठ्या टोळ्यांचा भंडाफोड झाला आहे. तपास यंत्रणांना त्यांच्या तस्करीच्या मार्गांची कल्पना आहे हे देखील उल्लेखनीय आहे. तसे बहुतेक मादक पदार्थ अफगाणिस्तानातून येतात.याशिवाय नेपाळ, पाकिस्तान, म्यानमार आणि बांगलादेशमार्गेही अंमली पदार्थ भारतात येत आहेत. यावरून देशातील तरुणाई अंमली पदार्थांच्या विळख्यात झपाट्याने येत आहे, याचा सहज अंदाज लावता येतो. शासन, पोलीस प्रशासन आणि तपास यंत्रणांनी काटेकोर व कडेकोट नजर ठेवल्यास अवैध अमली पदार्थांचा व्यापार उद्ध्वस्त करणे सोपे होणार आहे. पण पुढे तांत्रिक आव्हाने आहेत. कोरोनाच्या काळात इंटरनेटच्या अवैध स्वरूपात डार्कनेट आणि सागरी मार्गांच्या अवैध मार्गाने अंमली पदार्थांचा व्यापार वाढल्याचे दिसून आले आहे. दावा असा आहे की डार्कनेट मार्केटमधील नव्वद टक्के विक्री कथितपणे अंमली पदार्थांशी संबंधित आहे. देशातील हेरॉईन जप्तीचे प्रमाण तिप्पट होण्याचे हे एक प्रमुख कारण आहे.

आधुनिक तंत्राचा अवलंब करून तस्कर कायदा व सुव्यवस्थेच्या डोळ्यात धूळफेक करू शकतात. अशा स्थितीत सायबर आघाडीवर अंकुश ठेवण्यासाठी सरकारी यंत्रणांना प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करावा लागणार आहे. मात्र, जोपर्यंत समाज त्याच्या प्रतिबंधात सक्रियता दाखवत नाही तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही. अंमली पदार्थांचे सेवन ही एक सामाजिक समस्या आहे. यातील गंभीर बाजू म्हणजे पारंपारिक कौटुंबिक संरचनेचे विकेंद्रीकरण, स्वच्छंद जीवनशैली, सामाजिक अलिप्तता इत्यादीमुळे आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत असल्यामुळे ही समस्या गंभीर होत चालली आहे.

# आदिवासी विद्यार्थ्यांना मोठा दिलासा



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306


आधुनिक केसरी

**आदिवासी विद्यार्थी अतिदुर्गम भागात राहतात. त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट असते. तशाही परिस्थितीत ते शिक्षण घेतात. परंतु योग्य प्रशिक्षणाअभावी भारतीय प्रशासकीय सेवेसाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षांमध्ये ते पात्र ठरू शकत नाहीत. पर्यायाने उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांमध्ये अनुसूचित जमातीच्या उमेदवारांचे प्रमाण अल्प आहे. चार कोटींच्या निधीस मान्यताअनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व नागरी सेवा स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण होऊन प्रशासकीय अधिकारी होण्याची संधी मिळावी म्हणून अनुसूचित जमातीच्या गुणवत्ताधारक उमेदवारांना 'बार्टी' संस्थेच्या धर्तीवर दिल्ली वा महाराष्ट्रातील नामवंत खासगी प्रशिक्षण संस्थेत संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षांसाठी परीक्षा पूर्व प्रशिक्षण देण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे.**

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने पुढाकार घेत राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी यूपीएससीचे प्रशिक्षण देण्याची संधी उपलब्ध करून दिल्याने आदिवासी विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून ७३ वर्षांचा कालावधी लोटला असला तरी ग्रामीण व दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी बांधवांची फरफट अद्यापही कमी झालेली नाही. शिक्षण, आरोग्य यांसारख्या प्राथमिक सेवा-सुविधांचा दर्जा सुमार असल्याने आदिवासी बांधव जागतिक विकासाच्या तुलनेत कोसो दूर आहे. त्यामुळे देशाच्या प्रशासकीय सेवेत आदिवासी तरुण अधिकाऱ्यांची संख्या वाढविण्यासाठी राज्याच्या आदिवासी विकास विभागाने कंबर कसली आहे.

**१०० विद्यार्थ्यांची होणार निवड**

राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षांच्या तयारीसाठी खासगी नामवंत संस्थांमधून पूर्वपरीक्षा ते मुलाखत या सर्व टप्प्याचे प्रशिक्षण घेण्यासाठी आता राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागाने पुढाकार घेऊन नवीन योजना जाहीर केली आहे. यामध्ये १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार असून, त्यांना दिल्ली अथवा महाराष्ट्रातील संस्थांमध्ये यूपीएससीच्या तयारीसाठी प्रशिक्षण घेता येणार आहे. शासनाच्या कल्याणकारी योजनेमुळे देशाच्या प्रशासकीय सेवेत आदींचा टक्का वाढण्यास बदल होईल. राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये उत्तीर्ण होण्याचे प्रमाण इतर समाज घटकांच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. आदिवासी विद्यार्थी अतिदुर्गम भागात राहतात. त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट असते. तशाही परिस्थितीत ते शिक्षण घेतात. परंतु योग्य प्रशिक्षणाअभावी भारतीय प्रशासकीय सेवेसाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षांमध्ये ते पात्र ठरू शकत नाहीत. पर्यायाने उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांमध्ये अनुसूचित जमातीच्या उमेदवारांचे प्रमाण अल्प आहे. चार कोटींच्या निधीस मान्यताअनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व नागरी सेवा स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण होऊन प्रशासकीय अधिकारी होण्याची संधी मिळावी म्हणून अनुसूचित जमातीच्या गुणवत्ताधारक उमेदवारांना 'बार्टी' संस्थेच्या धर्तीवर दिल्ली वा महाराष्ट्रातील



नामवंत खासगी प्रशिक्षण संस्थेत संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षांसाठी परीक्षा पूर्व प्रशिक्षण देण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेची अंमलबजावणी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेतर्फे करण्यात येणार असून प्रशिक्षणसंस्थांची निवड यादी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत करण्यात येणार आहे. यासाठी चार कोटी नऊ लाखांच्या वार्षिक खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

**अशी आहे निवडप्रक्रिया**

राज्यातील रहिवासी असलेल्या व या प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या व नमूद सर्वसाधारण पात्रता पूर्ण करणाऱ्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांकडून अर्ज मागविले जातील. यासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण या संस्थेमार्फत वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात येईल. उमेदवारांची संख्या १०० पेक्षा जास्त असल्यास केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेच्या धर्तीवर प्रवेश परीक्षा घेऊन गुणानुक्रमे निवडयादी व प्रतीक्षा यादी प्रकाशित केली जाईल. प्रशिक्षणार्थ्यांना या योजनेचा फायदा केवळ एकदाच घेता येईल. प्रशिक्षणार्थीना मिळणाऱ्या सुविधा अशा - दिल्ली येथील नामांकित प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेत असल्यास प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यास दरमहा १२ हजार रुपये विद्यावेतन - महाराष्ट्रातील नामांकित प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेत असल्यास प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यास दरमहा आठ हजार विद्यावेतन - पुस्तक खरेदीसाठी प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यास एकदाच १४ हजार रुपये - दिल्लीतील केंद्रावर प्रशिक्षणाच्या काळात येण्याजाण्यासाठी दोन हजार रुपये प्रवास भत्ता देण्यात येणार आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# शिवसेना पुन्हा उभारी घेणार ...पण..!



प्रा . संग्राम मोरे, लातूर

आधुनिक केसरी

**कोणताही पक्ष पूर्णपणे संपत नसतो .त्यातल्या त्यात शिवसेना ही तर संपणारी नाहीच.फक्त प्रश्न आहे आत्ताच्या बंडानंतर किती वेगाने शिवसेना उभारी घेणार. शिवसेनेला उभारी घेण्यासाठी दोन वर्षाचा अवधी आहे. पक्ष नेतृत्वाने ठरवले तर दोन वर्षात प्रत्येक गाव पिंजून काढून शिवसेना फिनिक्स पक्षाप्रमाणे भरारी घेऊ शकते. त्यासाठी पक्षप्रमुखांनी गांभीर्याने व्युव्हरचना आखण्याची गरज आहे.**

"घोडा का अडला?, भाकरी का करपली? या प्रश्नाचे उत्तर न फिरवल्यामुळे. शिवसेना नावाचा पक्ष म्हणण्याऐवजी संघटना 1960 ला महाराष्ट्रामध्ये स्थापन झाली. खरंतर सत्ता, आमदार, खासदार, मंत्री याच्यासाठी शिवसेनेची स्थापनाच झाली नव्हती. त्या वेळची महाराष्ट्रातील एकूण परिस्थिती आणि विशेषतः मुंबईमधील परप्रांतीयांची घुसखोरी या एका मुद्द्यावर शिवसेनेची स्थापना झाली. बाळासाहेब ठाकरे यांच्या झंजावाताने महाराष्ट्रातील विशेषतः मुंबईतील जनतेला त्यांच्या मनातील पुल्लिंग जागृत करण्याचे काम करत होत होते. या सगळ्या परिस्थितीत पक्ष नसूनसुद्धा ही संघटना राजकीय पटलावर एवढी महत्त्वपूर्ण ठरत गेली की सत्तेत असो किंवा नसो, पण शिवसेनेचा विचार घेतल्याशिवाय सरकार कोणताही निर्णय घेऊ शकत नव्हते. संघटनेचे रूपांतर हळूहळू पक्षात होऊ लागले.मुंबईसारख्या महानगराची महानगरपालिका त्या ठिकाणी आपल्या पक्षाचे नगरसेवक निवडून येऊ लागले एवढेच नव्हे तर अख्खी महानगरपालिका शिवसेनेच्या ताब्यात येऊ लागली आणि कालांतराने मुंबई आणि शिवसेना हे समानार्थी शब्द झाले. मुंबईची गरज शिवसेना हे समीकरण आजही कायम आहे. हे कायम असण्याच्या मागे बाळासाहेब ठाकरे यांनी मुंबईत राहणाऱ्या लोकांच्या अडचणी विशेषतः मराठी लोकांच्या अडचणी, मराठी कामगारांच्या मराठी व्यावसायिकांच्या, मराठी तरुणांच्या मनातले स्फूल्लिंग जागी केल्यामुळे मुंबई आणि शिवसेना हे समीकरण कायम राहत गेले. कालांतराने शिवसेनेचे आमदार होऊ लागले आणि राजकीय दृष्ट्या वैचारिक एकवाक्यता म्हणून शिवसेनेने भारतीय जनता पक्षाबरोबर युती केली. जवळपास 25-30 वर्ष या दोन पक्षांची युती राहिली. 1995 ला या दोन पक्षांचे मिळून युतीचे सरकार महाराष्ट्राने अनुभवले. या सरकारमध्ये शिवसेना मुख्य स्थानावर होती. म्हणून शिवसेनेला मोठा भाऊ असे बिरूद प्राप्त झालं. भारतीय जनता पक्ष हा शिवसेनेच्या बोटाला धरून वाढत होता. 1995 ते 99 हा कालखंड सोडला तर पुन्हा 2014 पर्यंत शिवसेना आणि भारतीय जनता पार्टी हे दोघेही विरोधी पक्षात राहिले. परंतु आघाडी कायम राहिली. यादरम्यान शिवसेनेचे काही मातब्बर नेते पक्षातून बाहेर पडले. त्यामुळे शिवसेनेतून पक्षांतर होणे हे काही नवीन नाही. फक्त फरक एवढा की आजपर्यंत तंबुतून एक एक सैनिक बाहेर पडला. यावेळी मात्र अख्खा तंबूच उडून गेला. हे का घडले? या पाठीमागची कारणे आणि शिवसेनेचे भविष्य यावर चर्चा होणे आवश्यक आहे. मुळात बाळासाहेब ठाकरे यांच्या हयातीत छगन भुजबळ, नारायण राणे आणि स्वतः राज ठाकरे हे पक्षातून बाहेर पडले. पण बाळासाहेब ठाकरे नेतृत्व स्थानी असल्यामुळे यांच्या बाहेर पडण्याला त्या काळामध्ये फार महत्त्व प्राप्त झाले नाही. आज मात्र बाळासाहेबांच्या अनुपस्थितीत उद्धव ठाकरे हे पक्षाचे नेतृत्व करत असताना ज्या घडामोडी घडल्या त्या मात्र चर्चा आणि विश्लेषण करण्यासारख्या आहेत. कारण त्यातूनच शिवसेनेच्या भवितव्याची वाटचाल होऊ शकेल.

2014 ला शिवसेना आणि भारतीय जनता पक्ष या दोघांचे मिळून सरकार स्थापन झाले. पण यावेळी मात्र मोठा भाऊ आणि छोटा भाऊ हे बदलून भारतीय जनता पार्टी मोठा भाऊ झाला आणि शिवसेना छोटा भाऊ झाला. म्हणून खरी नाराजी ही तिथूनच सुरू झाली .आणि ती कमी की काय म्हणून त्यावेळी शरद पवारांनी भारतीय जनता पक्षाला पाठिंबा देऊ केला. पवार साहेबांच्या या एका वाक्यामुळे भाजप आणि शिवसेना यांचा 2014 ते 2019 पर्यंतचा प्रवास हा नेहमी संशयाचा, धोकेबाजीचा, परस्परांच्या अविश्वासाचा, परस्परांवरील दबावाचा असाच राहिला. त्यामुळे सत्तेत असूनसुद्धा शिवसेनेने भाजपवर टीका करण्याची एकही संधी सोडली नाही. तरीसुद्धा भारतीय जनता पक्षाने शिवसेनेची नेहमीच मनधरणी केली. हे करत असताना शिवसेनेचे हे कर्तव्य होते की, आपला पक्ष किती अभेद्य आहे हे तपासणे. आपला पक्ष छोटा भाऊ का झाला हे तपासणे, आपण कुठे कमी पडलो हे तपासणे. या बाबी शिवसेनेने पाच वर्षात करणे आवश्यक होते.परंतु शिवसेना केवळ भाजपवर टीका करत राहिली आणि भाजप आपले पाळेमुळे अधिक मजबूत करू लागला. या

ठिकाणी एक बाब लक्षात घेतली पाहिजे की शिवसेनेची ओळख ही टपरीवाला माणूस आमदार करणारा पक्ष, रिक्षावाला माणूस मंत्री करणारा पक्ष किंवा आणखी एखाद्या बेरोजगार तरुणाला मंत्री, मुख्यमंत्री करणारा पक्ष अशीच राहिली आहे. पण हाच टपरीवाला, रिक्षावाला आत्ता पक्षातला सरंजामदार झाला आहे, प्रस्थापित झाला आहे, त्याचे स्वतःचे नेतृत्व निर्माण झाले आहे, पक्षापेक्षा त्याच्या स्वतःच्या नेतृत्वाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे याच्याकडे लक्ष देणे पक्षप्रमुखांनी केलेच नाही. केवळ शिवसेनेतला प्रत्येक सैनिक हा शिवसेनेवरच निवडून येऊ शकतो हा भ्रम पक्षप्रमुखांचा राहिला. पण पुलाखालून एवढे पाणी वाहून गेले होते की टपरीवाले, रिक्षावाले टॅक्सीवाले हे आता मोठे भांडवलदार झाले आहेत आणि ते स्वतःच्या नावावर निवडूनही येऊ शकतात हे तपासण्याकडे गंभीर दुर्लक्ष झाले. 2019 च्या निवडणुका जाहीर झाल्या आणि जागावाटपावरून भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना यांच्यात वाटाघाटी सुरू झाल्या. काय चर्चा झाली, कशी झाली हे सगळं बंद दरवाजाआड झाल्यामुळे काय ठरले ते ना सैनिकांना कळू शकले ना महाराष्ट्रातील जनतेला. त्यामुळे उद्धव ठाकरे आणि अमित शहा या दोघांनी कोणत्या मुद्द्यावर युती केली हे त्या दोघांनाच माहीत. पण आज उद्धव ठाकरे सांगत आहेत की मुख्यमंत्रीपद शिवसेनेला देण्याच्या अटीवर ही युती झाली होती. पण जेव्हा 2019 च्या निवडणुकांची रणधुमाळी चालू होती तेव्हा उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीत अमित शहा जाहीररीत्या देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होतील असे ठणकावून सांगत होते. मग प्रश्न असा की उद्धवजींनी त्याचवेळी अमित शहा यांना जाब का विचारला नाही? असो. त्यामध्येही काही अडचणी असतील असे आपण समजू. पण निवडणुकांचे निकाल जाहीर झाले आणि पुन्हा शिवसेना छोट्या भावाच्या रूपातच निवडून आली. स्वाभाविकपणे भारतीय जनता पक्षाच्या जागा जास्त निवडून आल्यामुळे त्यांनी मुख्यमंत्री पदावर दावा सांगणे स्वाभाविक होते. त्यामध्ये या दोघातील बे-बनावाचा फायदा पवार साहेबांनी घेतला नाही तरच नवल.परिस्थिती ओळखून बरोबर पवार साहेबांनी शिवसेनेला मदत करण्याची, सोबत घेण्याची आणि सत्ता स्थापन करण्याची भूमिका घेतली आणि शिवसेनाही तयार झाली. हे सगळं महाराष्ट्रातील जनता आचिंबित होऊन पाहत होती. कारण महाराष्ट्रातील जनता ही ज्या लग्नासाठी उपस्थित राहिली होती त्या ठिकाणी वधू-वराची अदलाबदली झाल्याचे चित्र दिसून येत होते. तरीसुद्धा उद्धव साहेबांनी महाआघाडीच्या सरकारची घोषणा केली. अतिशय चानाक्षपणे या अनैसर्गिक आघाडीचे नेतृत्व पवार साहेबांनी उद्धवजींकडे दिले आणि उदधवजींच्या खांद्यावर बंदूक ठेवून राष्ट्रवादी काँग्रेसच खऱ्या अर्थाने सत्तेवर बसली. सामान्य शिवसैनिकापासून ते आमदार शिवसैनिकापर्यंत ही गोष्ट प्रत्येकाला कळत होती, पण परिस्थितीच एवढी नाजूक होती की तक्रार करावी तरी कोणाकडे. मुळात आपण हे लक्षात घेतले पाहिजे शिवसेना असो किंवा राष्ट्रवादी काँग्रेस हे जरी पक्ष असले तरी अप्रत्यक्षरीत्या हे दोन मालकांचे स्वतंत्र पक्ष आहेत. शिवसेनेचा मालक ठाकरे घराणे आणि राष्ट्रवादीचा मालक पवार.मग नेते, कार्यकर्ते, आमदार, मंत्री ही मंडळी फक्त डोके मोजण्यासाठी कामाचे आहे. या दोन्ही पक्षाचे निर्णय हे ठाकरे आणि पवार दोघेच घेतात. त्यामुळे आमदाराला मंत्र्यांना आणि कार्यकर्त्याला विचारात घेण्याची यांना कधी गरजच वाटली नाही.



शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या तीन पक्षांच्या महाविकास आघाडीने सरकार स्थापन झाले आणि तेव्हापासून खऱ्या अर्थाने भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना यांच्या शत्रुत्वात अधिकृत सुरुवात झाली. कारण शिवसेनेच्या सोबत निवडणुका लढवल्यामुळे भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना या दोघांना मिळून जनतेने पूर्ण बहुमत दिले होते. परंतु ऐनवेळी शिवसेनेने आपला निर्णय बदलल्यामुळे भाजप तोंडघशी पडली. शिवसेनेची चलबिचल ओळखून भाजपने राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर सरकार स्थापनेचा प्रयत्न केला. परंतु पवार साहेबांच्या आग्रहामुळे तो प्रयत्न दोन दिवस टिकला. भारतीय जनता पक्षाचा तिळपापड होणे स्वाभाविक आहे. कारण निवडणुकीपूर्वी शिवसेनेने अशी भूमिका घेतली असती तर भारतीय जनता पक्षाला स्वबळावर बहुमत मिळवणे यावेळी अवघड नव्हते. कारण युती करून लढून सुद्धा 105 जागा त्यांनी मिळवल्या होत्या. जर 288 जागा लढवल्या असत्या तर 150 चा आकडा गाठणे भाजपला कठीण नव्हते. परंतु शिवसेनेने निवडणुकीनंतर केलेल्या धोकेबाजीमुळे सत्तेचे समीकरण बिघडले. आता या खोलात या ठिकाणी जाणे उचित नाही.

आता खरा प्रश्न आहे की शिवसेना पुन्हा भरारी घेणार का? याचे उत्तर निश्चितच शिवसेना पुन्हा भरारी घेऊ शकते असेच आहे. परंतु शिवसेनेची भरारी घेण्याची वाटचाल कशी असावी याबद्दल मात्र चर्चा होऊ शकते आणि ती करण्याचा प्रयत्न या ठिकाणी आपण करू. खरं पाहता शिवसेनेने भाजपची साथ सोडण्याचे जे अनेक कारणे उद्धव ठाकरे सांगत आहेत त्यापैकी महत्त्वाचे कारण असे की त्यांच्या मते भाजपसोबत 25 वर्षे राहून आमचा पक्ष कमजोर झाला किंवा त्यांच्याच भाषेत सांगायचे झाले तर आमची 25 वर्ष युतीमध्ये सडली. पहिल्यांदा या विधानाची चिकित्सा केली असता असे लक्षात येते की शिवसेना-भाजप यांच्या 25 वर्षाच्या युतीमध्ये शिवसेनेचे तीन वेळा बंड झाले. परंतु त्याला फारसे महत्त्व आले नाही. म्हणजे 25 वर्षात तीन नेते शिवसेनेला सोडून गेले. आणि दुसरीकडे केवळ अडीच वर्षात 40 आमदार शिवसेनेला सोडून गेले. याचा गांभीर्याने विचार उद्धव ठाकरे यांनी करायला हवा की, 25 वर्षात आपले नुकसान जास्त झाले का अडीच वर्षात आपले नुकसान जास्त झाले? आणि हा विचारच शिवसेनेची उभारी कशी व्हायला हवी याचे उत्तर देणार आहे.

मुळात काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेसला कंटाळूनच जनतेने शिवसेना भाजप युतीला दोन वेळा कौल दिला होता हे नाकारता येणार नाही. पवार साहेबांचे राजकारण हे सातत्याने जुळवाजुळवीचे राजकारण असते. पूर्णपणे आपल्या पक्षाची सत्ता ही महाराष्ट्रात येणार नाही हे त्यांना पूर्ण माहित आहे. परंतु विविध कारणे काढून काही पक्षाची जुळवाजुळव करून सत्तेचा चेंडू आपल्या भोवती फिरत ठेवणे हे पवार साहेबांचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे शिवसेनेने आता हा विचार करण्याची गरज आहे की मुळात शिवसेना ही सत्तेसाठी स्थापन झालीच नव्हती. आणि जेव्हा शिवसेनेच्या नेतृत्वात सत्ता मिळाली तेव्हा ती शिवसेनेमुळे इतरांना सत्ता उपभोगण्याची संधी मिळाली. त्यामुळे राष्ट्रवादीला सोबत शिवसेना जी चर्चा करत आहे तेच मुळात चुकीचे आहे. त्यातल्या त्यात काँग्रेस राष्ट्रवादी आणि शिवसेना यांचे एकत्र येणे हे कोणालाच आवडणारे नाही. त्यामुळे काँग्रेस-राष्ट्रवादीच्या कुबड्या घेऊन शिवसेना उभारी घेऊ शकत नाही. उलट काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेसच्या मागील पन्नास वर्षाच्या कारभारात बदल करून नवी व्यवस्था निर्माण करण्याचे आश्वासन देऊनच शिवसेना पुढे जाऊ शकते .दुसरी बाब अशी की शिवसेनेचे जे वैशिष्ट्य आहे की रिक्षावाला टपरीवाला टॅक्सीवाला या पक्षात आमदार होऊ शकतो, खासदार होऊ शकतो या गोष्टींना आता 30-40 वर्षाचा इतिहास झाला आहे. अलीकडच्या 25 वर्षात सामान्यातला सामान्य शिवसैनिक आमदार झाल्याचे उदाहरणे अत्यंत तुरळक आहेत. म्हणून पुन्हा शिवसेनेने आपल्या मूळ वैशिष्ट्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. आज एवढे मोठे बंड होऊन सुद्धा आमदार मंत्री खासदार यांनी पक्ष सोडला, पण सामान्यातल्या सामान्य शिवसैनिकांनी आजही पक्ष सोडला नाही हे त्या वैशिष्ट्याचेच गमक आहे. म्हणून शिवसेनेने नव्याने नेतृत्व निर्माण करण्याची, त्यांना संधी देण्याची आवश्यकता आहे. तिसरी बाब अशी की जेव्हा शिवसेनेची स्थापना झाली त्यावेळेसच्या शिवसेनेच्या भाषेवर महाराष्ट्रातील तरुणाई शिवसेनेकडे आकर्षित होत गेली. आज तीच भाषा वापरावी असे नाही. मात्र ज्याला आपण आपला बाणा म्हणतो तो ठाकरी बाणा शिवसेनेच्या नेतृत्वाने नव्याने शिकण्याची गरज प्रकर्षाने जाणवते आहे. कारण अर्ज विनंती करणारी शिवसेना कधीच नव्हती. ठोकून मागणी पूर्ण करून घेणे हे शिवसेनेचे वैशिष्ट्य होते. आज शिवसेनेचे नेतृत्व त्या पद्धतीने होण्याची गरज आहे. तिसरी बाब अशी की आजपर्यंत शिवसेना म्हणजे मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, संभाजीनगर असे समीकरण राहिले आहे. परंतु चांद्यापासून बांद्यापर्यंत गाव तेथे शाखा ही उपाययोजना शिवसेनेला करावी लागेल. आपल्याला आठवत असेल एकेकाळी शिवसेनेचा शाखाप्रमुख हा आमदारापेक्षा जास्त महत्त्वाचा होता. शिवसेनेने काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस बरोबर जाऊन आपले महत्त्व स्वतःच संपवून टाकले आहे. कारण शिवसेना सत्तेवर नसतानासुद्धा काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसचे नेतेमंडळी शिवसेनेच्या शाखाप्रमुखाला स्वतः भेटायला यायची आणि आज काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेसच्या साध्या साध्या आमदाराला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी शिवसेनेच्या जिल्हाप्रमुखाला बॅनर लावावे लागतात. हेच मुळात न पटणारे गणित आहे. म्हणून शिवसेनेने आपले महत्त्व पुनश्च ओळखून ते नव्याने स्थापन करण्याची गरज आहे.चौथी बाब अशी की येणाऱ्या काळात शिवसेनेच्या पक्षप्रमुखांना 288 जागा स्वतःच्या ताकतीवर लढण्याची तयारी ठेवावी लागेल. कारण युती करून स्वतः शिवसेना अर्ध्या जागेवर आली आणि आता तीन पक्ष सोबत युती करून तर शिवसेना केवळ शंभर जागा लढवण्याचा हक्क सांगणार होती. म्हणजे यापूर्वी 150 जागा लढवून शिवसेनेला 56 जागा मिळवता आल्या. आता महाविकास आघाडीत जर शिवसेना पुन्हा राहिली तर 100 जागा लढवून शिवसेना किती जागा जिंकणार? हा विचार करण्याचा प्रश्न आहे. म्हणून शिवसेनेने पक्षाची पुनर्बांधणी करताना फक्त शिवसेना म्हणजे शिवसेना हे सूत्र हाती घ्यावी लागेल. यामधून एक गोष्ट नक्की साध्य होईल.ती म्हणजे शिवसेना एक तर पूर्ण सत्तेत येईल किंवा पूर्ण विरोधी पक्षात येईल. या दोन्ही गोष्टी होणे शिवसेनेसाठी फायद्याचेच आहे. उलट शिवसेना विरोधी पक्षाच्या भूमिकेत राहिली तेव्हा तेव्हा शिवसेना जास्त ताकतवान होती. आणि सर्वात शेवटी शिवसेनेने जाणीवपूर्वक शिवसेनेची भाषा बोलणारे नेतृत्व समोर आणण्याची गरज आहे. कारण अलीकडच्या काळात फक्त राज्याचेच नव्हे तर देशाचे राजकारण सुद्धा राशनपेक्षा भाषणवरच जास्त होताना दिसत आहे. त्यामुळे शिवसेनेने जाणीवपूर्वक या बाबीकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

# राष्ट्रीय राजकारणात आसामचा उदय

आधुनिक केसरी

भारतातील राष्ट्रीय राजकारण सतत बदलत असतं आणि राजकारणातील चेहरेसुद्धा बदलत असतात. आतापर्यंत दिल्लीच्या राष्ट्रीय राजकारणात वंश परंपरेने किंवा वारसाहक्काने प्रवेश करायचे व निरंकुशपणे राजकारण करायचे. सत्तेचा मनमुराद आनंद घ्यायचे, पण आता प्रधानमंत्री नरेंद्रभाई मोदी, गृहमंत्री अमित शाह यांच्या कणखर नेतृत्वामुळे भारतीय राजकारणाची दिशा बदलली आहे. राजकाराणाच्या राष्ट्रीय पटलावर राष्ट्रभक्तीने प्रेरित व समाजकार्यासाठी धडपड करणाऱ्या नेते मंडळींचा उदय होत आहे. त्यामध्ये आसाममधून केंद्रीय मंत्री तथा भाजपाच्या संसदीय बोर्डाचे सदस्य सर्वानंद सोनोवाल व आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांचा राष्ट्रीय राजकारणामध्ये मोठा दबदबा वाढला आहे. हिंदुत्वाची कणखर भूमिका घेणारे हिमंत बिस्वा तर योगी आदित्यनाथाप्रमाणे देशातील तरुण मंडळीच्या गळ्यातील ताईत ठरले आहेत. सोशल मीडियावरसुद्धा चांगले प्रसिद्ध झाले आहेत.





आसाम राज्य देशाच्या उत्तर-पूर्वोत्तरात ब्रम्हापुत्र नदी व बराक नदी तथा पूर्व हिमालयाच्या दक्षिण भागातील सीमावर्ती राज्य आहे. आसामला पूर्वोत्तर राज्याचे प्रवेशद्वारसुद्धा म्हटले जाते. तेथे इ.स. 1828 पर्यंत अहोम राजाचे साम्राज्य होते. परकीय इस्लामी आक्रमकाच्या काळातसुद्धा त्यांनी आपले साम्राज्य टिकविले होते. परकीय इस्लामी आक्रमणकारी टोळ्याचा बंदोबस्त करुन आसाममध्ये प्रवेश करु दिला नाही. औरंगजेबच्या काळात जेव्हा देश मोघली सत्तेविरूद्ध लढला होता तेव्हा आसामच्या भूमीवर लाचित बोडफुकन या योध्दाने लढाउबाणा दाखवून परकीय मोघली सैन्याला सळो की पळो करून पळता भुई थोडी केली होती. लाचित बोडफुकन यांना आसामचा प्रतिशिवराय समजले जाते. आसाम राज्य संस्कृतिक दृष्टिने वैभवशाली राज्य आहे. तेथे भारतीय संस्कृतीचे सर्व सण, उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे होतात. सांस्कृतिक राष्ट्रवादाचा विचारसुद्धा खोलवर रुजलेला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक दादाराव परमार्थ व कृष्णराव परांजपे यांनी वर्ष 1946 मध्येच आसाममध्ये पहिली संघाची शाखा सुरु केली व संघ कार्याचा विस्तार करून आसाम भूमिवर हिंदुत्वाच्या व सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या विचारांची पेरणी केलेली आहे आज हिंदुत्वाचा विचार आसामच्या मातीमध्ये खोलवर रुजलेला आहे. आसाम राज्य चहा उत्पादन साठी प्रसिद्ध असुन जवळपास 55% चहा उत्पादन एकट्या आसाममध्ये होत असते, त्यामुळेच तेथे रोजगाराचे स्त्रोत चांगले आहेत.पण आसाममधून ब्रम्हपुत्र नदी जात असल्याने तेथे पुराची समस्या फार मोठ्या प्रमाणात आहे. दरवर्षी अतिव्रष्टि तथा पुरामुळे जनजीवन सतत विस्कळीत होत असते. तत्कालीन मुख्यमंत्री व्यावसायने वकील असलेल्या सर्वानंद सोनोवाल व विद्यमान मुख्यमंत्री हिमंत बिस्वा शर्मा यांनी पुरग्रस्तांसाठी उत्कृष्ट काम केले. रस्त्यावर येऊन जनतेसाठी मदतकार्य करणारे मुख्यमंत्री म्हणून त्यांच्येकडे पहिले जाते. विद्यमान मुख्यमंत्री हिमंत बिस्वा यांनी अवैद्य बांगलादेशी घूसखोरा संबंधी कडक भूमिका घेऊन त्यांना परतीचा मार्गसुद्धा दाखविला आहे. तसेच त्यांच्या जनतेच्या पैश्यामधून धार्मिक शिक्षण मदरसा शिक्षण विषयाच्या भूमिकेवर देशात मोठी चर्चा झालेली आहे. एकूणच एरव्ही पुरग्रस्ताच्या समस्यांसाठी प्रसिद्ध असलेल आसाम महाराष्ट्रातील सत्तांतराचे केंद्रबिंदु ठरल्यामुळे देशात गाजले आहे. तसेच केंद्रीयमंत्री सर्वानंद सोनोवाल यांची भाजपाच्या केंद्रीय सांसदीय समितीमध्ये नियुक्ती तथा विद्यमान मुख्यमंत्री हिमंत बिस्वा यांच्या हिंदुत्वाच्या कणखर भूमिकेमुळे देशाच्या राष्ट्रीय राजकारणमध्ये आसामचा उदय होत आहे.

**–अशोक राणे,**
अकोला, संपर्क क्र. 9423658385

# भूसंपादनातून कोट्यवधी कमावणाऱ्या टोळीला यापुढे लगाम...?



सुनिल सिरसाट
संपर्क क्र. : 9422742442.

आधुनिक केसरी

**काल-परवा ऐका जिल्ह्याच्या दौऱ्यावर उद्योगमंत्री ना. उदय सामंत गेले होते. त्यांनी भूसंपादनबाबत चालू सरकार नवीन धोरण आणणार असल्याचे सुतोवाच केले आहे. एक चांगला निर्णय होणार आहे. रस्ता विस्तारीकरण व अन्य कामांसाठी शासन भूसंपादन करते, त्याचा मोबदला देते. पूर्वी हा मोबदला इतका कमी राहात असे की, जमीनमालक जमीन जावू नये म्हणून कोर्टात जात असत. त्यानंतर धोरण बदलले. जमिनीला बाजार भावानुसार, रेडी रेकनरच्या दुप्पट-चार पट दर दिले जावू लागले. जमिनी वरील फळझाडे अन्य झाडे, शेड, विहिर, राहते घर वगैरे अचल संपतीचा दणकावून मोबदला मिळू लागला. त्यामुळे हायवे रस्ता काम व अन्य सरकारी कामात ज्यांची जमीन जावू लागली ते मलामाल होवू लागले. या स्थितीचा धंदेवाईक अधिकारी व धनदांडग्यांनी लाभ घेणे सुरू केले. परंतु आता यापुढे असे न होता. अशा टोळीला लगाम बसणार असून यापुढे थेट शेतकऱ्यांच्या हितासाठीचे भू-संपादन धोरण आखण्याचा सरकारचा मानस असल्याचे मंत्री महोदयांनी बोलून दाखवले आहे. या दृष्टिकोनातून तशी औपचारिक बैठकीही झाली असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली असून लवकरच येणाऱ्या मंत्रीमंडळात मूळ नियमांत फेरफार (बदल) करून नवे धोरण अस्तित्वात येणार असल्याचे दाट संकेत सावंतांच्या सुतोवाचावरुन दिसून येत आहे.**

## यापुढे देणार-घेणार दोन्ही शेतकऱ्यांना मिळणार मावेना

परंतु परवा ना.उदय सामंत यांनी सांगितले की, भुसंपादनात एखादी जमीन जात असेल व ती जमीन अलिकडे वर्षभरात दुसऱ्या कुणी खरेदी केली असेल तरी या वाढीव भूसंपादन रकमेच्या मोबदल्यात विक्री करणाऱ्या मूळ शेतजमीन मालकासही लाभ मिळावा असे धोरण आखण्यात येणार आहे. 'अत्यंत लोकाभिमुख' असा हा निर्णय ठरणार आहे. राज्यभरात त्याचे स्वागतच होईल. देशात रस्ते वाहतूक मंत्री ना. नितीन गडकरी चांगले काम करीत आहेत. त्यांच्या कडे कुणी बोट दाखवू शकलेले नाही. पण त्यांच्या अखत्यारितील राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण अर्थात न्हईच्या आधिकाऱ्यांच्या बाबतीत काय....? ही बहुतेक सर्व मंडळी काय तुफान 'छापून' राहिले आहेत. आता मागील पंधरवाड्यात सीबीआयने न्हईच्या सुरज प्रकाश नावाच्या जनरल मॅनेजरवर छापेमारी केली. अनेक व्यावसायिक गाळे, प्रचंड कॅश, सुवर्ण रोखे, सोने-चांदी, प्रॉपर्टी प्रचंड घबाड सापडले. सात कोटी चाळीस लाख जप्त केले. तो आणि त्याची शिक्षिकापत्नी ईशा या रकमेचा स्त्रोत सांगू शकले नाहित. दोघांना अटक करण्यात आली. न्हईतला हा उदाहरणार्थ एक लहान मासा आहे. आज शंभर-शंभर कोटीतले बडे मासे या महाराष्ट्रात व खान्देशात उपलब्ध आहेत. स्वतःला ते सिंह किंवा सिन्हा म्हणवून घेतात. खान्देशातील अशाच एका अधिकाऱ्याने हेच प्रचंड उद्योग केले. त्याच्याच हातात संभाव्य संपादित होणाऱ्या जमिनींचे आराखडे असावयाचे. त्यास आधिच माहित असावयाचे. त्यामुळे या प्रकारे सिंडिकेटमध्ये स्लिपिंग पार्टनर होवून अशा हायवे व डायव्हर्शनमध्ये जाणाऱ्या जमिनी शेतकऱ्यांना फसवून घेवून ठेवल्या. नंतर कोट्यधीत अवार्ड मंजूर करून घेतले. अर्थात त्याच्याकडे जाणाऱ्याचे लक्ष अखेर गेलेच....!





थेट दिल्लीला केंद्रिय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे त्याची फाईल पोहोचविण्यात आली. त्याबाबत जाहीर बोंबाबोंब देखील करण्यात आली. त्यानंतर काय झाले कुणास ठाउक..? बडा मासा असणाऱ्या त्या शेरची देखील शिकार झाली वाटते...? त्यानंतर प्रकरण एकदम सामसूम झाले. नहले पे दहेला झाले. भूसंपादन रॅकेटच्या प्रचंड कमाईतल्या 'साईड इफेक्ट'चे हे एक प्रकरण आहे. अशी भरपूर प्रकरणे असतात. ज्याची जमीन जाते, तो शेतकरी कोरडाच राहतो व त्याच्या जमिनीच्या अवाढव्य मोबदल्यावर सिंडीकेटमधील ही साखळीच मजा मारीत असते. त्यामुळे खरेदी-विक्री झालेली असली तरी मूळ जमीनमालक शेतकऱ्यास लाभ देण्याचा सरकारचा विचार स्वागतार्ह आहे.

खरेतर या सिंडिकेटवाल्यांनी जमीन खरेदीसाठी खरेदी खतात जेवढी रक्कम शेतकऱ्यास दिली असेल, तेवढीच रक्कम या सिंडिकेटवाल्यांना देवून उर्वरित सर्व रक्कम मूळ शेत मालकास दिली गेली पाहिजे. तरच या फसवणूकीच्या धंद्यास लगाम बसेल. अशीही मागणी होऊ लागली आहे. शेवटी राजकारणी हे राजकारणीच असतात.

### बोलाचा भात अन् बोलाची कडी....!

**असाच बहुतांशी प्रकार नेतेगण मंडळींचा असतो. ज्या समाजपयोगी निर्णयामधे त्यांना फायदा होत नाही असा निर्णय शक्यतो सरकार घेतच नाही. असाच काहीसा अनुभव आजपर्यंतचा असल्याने अखेर या तोंडी निर्णयावर कागदोपत्री शिक्कामोर्तब होत नाही. तोवर काहीच खरे नाही. तेंव्हा तुर्तास शेतकऱ्यांना वाट पाहण्याशिवाय गत्यंतर नाही. परंतु जर का हा निर्णय अस्तित्वात आलाच तरमात्र आजपर्यंत कधी-कधीच शेतकरी हिताचे निर्णय झाले नाहीत. ऐवढा हा निर्णय हिताचा होईल आणि स्वप्नातदेखील आले नाही, येणार नाही. असा ध्यानीमनी नसतानाही शेतकरी बिचारा अनपेक्षित मालामाल होईल हे मात्र निश्चित.....!!**

### आतापर्यंत राजकारणी, अधिकारीच मालामाल

एखादा रस्ता, डायव्हर्शन रस्ता, किंवा अन्य सरकारी काम कोणत्या भागात कोणत्या सर्व्हे नंबरमध्ये होणार आहे. याचे आराखडे-नकाशे संबंधित अभियंते-अधिकारी यांना माहित असतात. ते स्वतः त्यांचे एजंट किंवा धनदांडगे पुढारी एकत्र येतात. आपली जमीन भूसंपादनात जाणार आहे. ही बाब माहीत नसणाऱ्या शेतकऱ्यास गाठतात. स्वस्तात जमिनीचे सौदे किंवा खरेदी करून घेतात. त्यानंतर आंध्रातून मोठमोठी चार-पाच वर्षे वयाची फळझाडांची रोपे आणून लावतात. थातूर-मातूर शेड वगैरे, बांधकाम उभे करून ठेवतात. नंतर ठरल्याप्रमाणे भूसंपादनाच्या नोटिसा निघतात. या धंद्यात स्लीपिंग पार्टनर असलेले अधिकारी, त्यांचे कर्मचारी यांच्याच हातात पंचनामे करण्याचे काम असते. ते हवे तसे वाढीव क्षेत्र, झाडे, बांधकाम वगैरे दाखवून भरपूर नुकसानीचे पंचनामे तयार करून घेतात. त्यात खालच्या सर्वांना खूष ठेवतात. अगदी मोजमापाचा टेप धरणारा कर्मचारीदेखील रग्गड कमाई करतो. बरं एकदा पंचनामा होवून काम सुरु झाले, की झाडे शेड विहिरी वगैरे सर्व तोडफोड करून नष्ट केली जातात. म्हणजे नंतर तक्रार झाली तरी चौकशीसाठी पुरावा उपलब्ध नसतो. सर्व काही आरामात जिरून जाते. ज्याची जमीन गेली तो मुळ शेतकरी कोरडाच राहतो. ही पद्धत सर्वत्र सुरु आहे. प्रकल्पाचे आराखडे बनविणाऱ्या अधिकारी, अभियंत्यांपासून ते भूसंपादन कार्यालयापर्यंत मधल्या दलालांच्या मार्फत तुफानी 'माल' गोळा केला जातो. मुळ जमीन मालकावर अन्याय होतो. ही सर्वसाधारण पद्धत आहे.

# निसर्गरम्य ठिकाण : गणपती पुळे



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७


आधुनिक केसरी

**गणपतीपुळ्याला गणपतीपुळे हे नाव कसे पडले याचीही एक कथा आहे. पूर्वी या गावात फारशी वस्ती नव्हती. वस्ती झाली ती गावाच्या उत्तरेच्या बाजूला. गाव पश्चिम दिशेने उतरण असून बराचसा भाग पुळणवट आहे. हिंदुस्थानच्या पश्चिम भागाची मुख्य सीमा जो सिंधुसागर आहे, त्या लगतचे गाव असून सकल देवतांमध्ये आराध्यदैवत अशी श्री मंगलमुर्ती तिने आपल्या निवासस्थानाला योग्य ठिकाण असे पाहून या समुद्रकिनारी निवास केला आहे. समुद्रापुढे पुळणीचे म्हणजेच वाळूचा किनारा, भव्य मैदानात गणपतीचे महास्थान असल्यामुळे या गावाला गणपतीपुळे म्हटले जावू लागले.**

मुंबईपासून सुमारे ३५० कि.मी. अंतरावर कोकणातील रत्नागिरी जिह्यात गणपतीपुळे गणपतीचे मंदिर आहे. हे पेशवेकालीन अती प्राचीन मंदिर आहे. या लंबोदराच्या स्थानाचा इतिहास मुद्गल पुराणादी, प्राचीन वाङमयात पश्चिमद्वार देवता या नावाने आहे. कोकणातील प्रत्येक देवस्थान आणि देवतांविषयी वेगवेगळ्या दंतकथा आहेत. तशीच या स्थानाविषयी पण आहे.

हिंदुस्थानच्या आठ दिशांत आठ द्वार देवता आहे. त्यापैकी गणपतीपुळ्यातील देवता ही पश्चिमद्वार देवता आहे.

मोगलाईच्या काळात सुमारे इ.स. १६०० च्या पूर्वी, आज ज्या ठिकाणी स्वयंभू गणेश मंदिर आहे, त्या ठिकाणी डोंगराच्या पायथ्याशी केवड्याचे बन होते. त्या ठिकाणी बाळंभटजी भिडे हे ब्राह्मण रहात होते. ते गावचे खोत होते. मोगलाईच्या काळात भिडेंवर संकट कोसळले. भिडे हे दृढनिश्चयी होते. "आलेले संकट निवारण झाले तरच अन्नग्रहण करीन", असा निश्चय करुन त्यांनी आराघ्य दैवत मंगलमूर्तीची उपासना करण्यासाठी या केवड्याच्या बनात तपस्या करण्यासाठी मुक्काम केला. अन्नपाणी वर्ज करणाऱ्या भिडेंना एके दिवशी दृष्टांत झाला की, "मी या ठिकाणी भक्तांच्या कामना परिपूर्ण करण्यासाठी आगरगुळे (गणेशगुळे) येथून दोन गंडस्थळे व दंतयुक्त स्वरुप धारण करुन प्रकट झालो आहे. माझे निराकार स्वरुप डोंगर हे आहे. माझी सेवा, अनुष्ठान, पूजाअर्चा कर, तुझे संकट दूर होईल." असा दृष्टांत झाला. त्याच कालखंडात खोत भिडे यांची गाय सतत काही दिवस दूध देत नव्हती. म्हणून गुराख्याने बारीक लक्ष ठेवले. तेव्हा त्याला दिसले की सध्याच्या मूर्तीच्या जागी डोंगरावरील एका शिळेवर गायीच्या स्तनातून सतत दूधाचा अभिषेक होत होता. हा प्रकार त्याने खोतांना सांगितला, त्यांनी तात्काळ सर्व परीसराची सफाई



केली व त्यांना दृष्टांतातील गणेशाची मूर्ती आढळली. त्या ठिकाणी गवताचे छप्पर घालून त्यांनी छोटेसे मंदिर उभारले. आणि धार्मिक कृत्ये भिडे भटजींनी सुरु केली.

गणपतीपुळ्याला गणपतीपुळे हे नाव कसे पडले याचीही एक कथा आहे. पूर्वी या गावात फारशी वस्ती नव्हती. वस्ती झाली ती गावाच्या उत्तरेच्या बाजूला. गाव पश्चिम दिशेने उतरण असून बराचसा भाग पुळणवट आहे. हिंदुस्थानच्या पश्चिम भागाची मुख्य सीमा जो सिंधुसागर आहे, त्या लगतचे गाव असून सकल देवतांमध्ये आराध्यदैवत अशी श्री मंगलमुर्ती तिने आपल्या निवासस्थानाला योग्य ठिकाण असे पाहून या समुद्रकिनारी निवास केला आहे. समुद्रापुढे पुळणीचे म्हणजेच वाळूचा किनारा, भव्य मैदानात गणपतीचे महास्थान असल्यामुळे या गावाला गणपतीपुळे म्हटले जावू लागले.

गणपतीपुळे हे रत्नागिरी जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ आहे. येथील गणपतीची मूर्ती स्वयंभू आहे अशी मान्यता आहे. सह्याद्री पर्वतातील डोंगराळ भागात विराजलेली नैसर्गिक मूर्ती आणि जवळच पश्चिमेला अरबी समुद्र ह्यामुळे हे देऊळ आगळेवेगळे आहे. गणपतीची मूर्ती डोंगराच्या बाजूला असल्याने तिला प्रदक्षिणा घालण्यासाठी संपूर्ण डोंगराला प्रदक्षिणा घालणे क्रमप्राप्त असते. १ किलोमीटर लांबीचा हा प्रदक्षिणामार्ग समुद्र, वाळूचा किनारा आणि नारळ पोफळीच्या झाडांमुळे निसर्गरम्य असा परिसर आहे. या ठिकाणी समुद्र आणि वाळूचा किनारा असल्याने तेथे पर्यटकांची अतिशय गर्दी असते. पर्यटक सुट्ट्या मधे पुळ्याच्या समुद्राला अवश्य भेट देतात.महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ (S.T.) मुंबई, पुणे, कोल्हापूर, नाशिक इत्यादी शहरांपासून गणपतीपुळे येथे जाण्यासाठी थेट बससेवा पुरवते.खाजगी स्वतः च्या वाहनाने येणाऱ्यांची संख्या खूप असते.

गणपतीपुळे येथे महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ ( एमटीडीसी. )चे विश्रामगृह आहे. त्याशिवाय देवळातील पुजाऱ्यांचे घरीसुद्धा राहण्याची सोय होऊ शकते.भक्तनिवास आहे. समुद्रकिनारा, निसर्ग, यामुळे गणपतीपुळे हे पर्यटनाचे ठिकाण झाले आहे. दरवर्षी लाखोच्या संख्येने पर्यटक भेट देतात.त्यांचे निवासाची सोयी साठी संस्थानाचे भक्तनिवास आहे.पाणी, चहा,कॉंफिची,व्यवस्था आहे.पारकिंग,लिफ्टची सोय आहे.

याचवेळी आजूबाजूला असलेली, मालगुंडला- केशवसुत स्मारक, ओंकारेश्वर मंदिर, लोकमान्य टिळक जन्मस्थान-रत्नागिरी, स्वामी स्वरुपानंद मठ- पावस, वेळणेश्वर,उमा महेश्वर मंदिर- हेदवी,ई. ठिकाणे बघता येतात.

निसर्रम्य अशा गणपतीपुळेला भेट देऊन गणपतीचे दर्शन आणि पर्यटन अशा दोन्ही गोष्टी साध्य होतात.आणि मन प्रसन्न होते.

# आ. बंब यांच्याविरोधात काढलेल्या मोर्चातील सहभागी शिक्षकांवर शिस्तभंगाची कारवाई करा

## औरंगाबाद जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश गटणे यांना दिले पत्र

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जिल्हयातील गंगापूरचे आमदार प्रशांत बंब व राज्य शासनाच्याविरोधात दि.29 ऑगस्टला बेकायदेशीरपणे वैजापूर येथील काढलेल्या मोर्चातील सहभागी झालेल्या शिक्षकांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद औरंगाबाद यांना एका पत्राद्वारे दत्तू कऱ्हाळे, धामोरीचे उपसरपंच रविंद चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य राजाभाऊ गायकवाड, भगवान गाढे यांनी केली आहे. विशेष म्हणजे या पत्रात शासनाचे विविध संदर्भ देखील देण्यात आलेले आहेत.

पत्रात म्हटले आहे की, दि.23 ऑगस्ट 2022 रोजी विधान भवनामध्ये गंगापूर खुलताबाद मतदार संघाचे आमदार प्रशांत बंब यांनी शासकीय कर्मचारी शिक्षक, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, आरोग्य सेवक व इतर शासकीय सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना मुख्यालय राहण्याबद्दल दिल्या जाणाऱ्या घरभाडे भत्त्याच्याविषयी आवाज उठवला होता. दरम्यान खरे पाहता 20 सप्टेंबर 1984 च्या वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार ग्रामीण भागातील सर्व कर्मचाऱ्यांना मुख्यालय राहणे ही अट बंधनकारक करण्यात आली आहे. याशिवाय त्यांना घर भाडे, भत्ता देऊ नये अशा स्पष्ट स्वरूपाच्या सूचना या परिपत्रकात नमूद करण्यात आल्या आहेत. यानंतर वेळोवेळी सुधारणा



होत पंचायत राज समितीच्या शिफारशी मान्य करत शेवटचा शासन निर्णय म्हणजेच 9 सप्टेंबर 2019 रोजी निर्गमित झाला. या शासन निर्णयामध्ये घर भाडे, भत्ता घेण्यासाठी कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहावे व कर्मचारी मुख्यालयी राहण्याबाबतचा ग्रामसभेचा ठराव घेणे बंधनकारक केले आहे. याविषयीचा सखोल अभ्यास करून आमदार प्रशांत बंब यांनी विधानसभेत शासनाच्या होणाऱ्या खर्चाचा अपव्यय टाळण्यासाठी प्रशांत बंब यांनी आवाज उठवला होता. मात्र काही शिक्षकांना आमदार बंब यांनी उठवलेला मुद्दा पटला नसून मुख्यालयी न राहता शासनाचा कोट्यावधी रुपयाचा घर भाडे, भत्ता फस्त करणाऱ्या शिक्षकांना ही बाब जिव्हारी लागली आहे. यामुळे काही शिक्षकांनी वैजापूर तालुक्यातील शिक्षक समन्वय समितीच्या माध्यमातून वैजापूर शहरात बेकायदेशीर मोर्चा काढला. या मोर्चाच्या माध्यमातून शिक्षकांनी विविध प्रकारच्या घोषणा देत आमदार बंब यांच्या विरोधात निदर्शने केली. आमदार प्रशांत बंब यांनी शासनाचे धोरणाचे अंमलबजावणी व्हावी हा माफक हेतू ठेवत विधानभवनामध्ये आवाज उठवला होता तरीही शिक्षकांनी या मुद्द्याच्या विरोधात म्हणजेच शासनाच्या धोरणाच्या विरोधात आवाज उठवत बेकायदेशीरपणे मोर्चाचे आयोजन केले व निदर्शने केली. याविषयी विविध वृत्त मराठी वृत्तवाहिन्यांवर बातम्या प्रसारित झाल्या आहेत. ही बाब संदर्भ क्रमांक सहाच्या कलम 9 व कलम 6 तसेच कलम 22 चे उल्लंघन करणारी आहे, शिवाय संदर्भ क्रमांक 7 नुसार निर्गमित झालेल्या शासन निर्णयामध्ये शिक्षकांच्या कुठल्याही मान्यता प्राप्त संघटनेचा उल्लेख आढळून येत नाही यामुळे शिक्षकांची राज्य सरकारच्या वतीने मान्यता प्राप्त संघटना आहे किंवा कसे याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

मान्यता प्राप्त संघटना नसतानाही अशा स्वरूपाची निदर्शने करणे व मोर्चे काढणे ही अतिशय निंदनीय बाब असून आपला शासकीय कर्मचाऱ्यांवर कुठलाच दबाव किंवा नियंत्रण राहिलेले या अनुषंगाने दिसून येत नाही तसेच संदर्भ क्रमांक 4 नुसार लोकप्रतिनिधींना शासकीय कर्मचाऱ्यांनी सौजन्याची वागणूक द्यावी तसेच शासकीय नियम तसेच धोरणानुसार शक्यतोवर मदत करावी अशा स्वरूपाचे शासन निर्णयात नमूद असताना देखील लोकप्रतिनिधीचा सुद्धा या शिक्षकांनी अनादर केला आहे.

संदर्भ क्रमांक 6 च्या कलम 9 च्या उपकलम 3 नुसार शासनाच्या धोरणाच्या विरोधात टीका करणे किंवा निदर्शने करून प्रसार माध्यमांना आपल्या प्रतिक्रिया कळवणे हा देखील गुन्हा ठरतो तरी संबंधित शिक्षकांची तात्काळ योग्य ती चौकशी करून मोर्चामध्ये सहभागी झालेल्या सर्व शिक्षकांवर तात्काळ शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावित करण्याची मागणी दत्तू पाटील कऱ्हाळे शिरेगावकर, रवींद्र रावसाहेब चव्हाण उपसरपंच धामोरी, राजाभाऊ भीमसेन गायकवाड, भगवान विठ्ठल गाढे यांनी केली आहे.

### हे आहेत संदर्भ

**१) २० सप्टेंबर १९८४ चा वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार ग्रामीण भागातील कर्मचार्यांनी मुख्यालयी राहावे तरच घरभाडे भत्ता द्यावा या अनुषंगाचे परिपत्रक. २) 9 सप्टेंबर 2019 चे घर भाडे भत्ता मिळण्यासाठी ग्रामसभेचा ठराव लावण्याबाबतचे परिपत्रक. ३) महाराष्ट्र नागरिक सेवा वर्तणूक अधिनियम 1979 च्या कलम तीन नुसार. ४) दिनांक 05 मार्च 2020 रोजी चा सामान्य प्रशासन विभागाचा लोकप्रतिनिधींना सौजन्याची वागणूक देण्याबाबतचा शासन निर्णय. ५) महाराष्ट्र नागरी सेवा अधिनियम 1981 च्या कलम 34 नुसार कर्मचारी पूर्ण वेळ सेवक असणे. 6) महाराष्ट्र वर्तणूक अधिनियम 1979 च्या कलम 6,कलम 9 तसेच कलम 22 चे उलंघन. 7) शासकीय कर्मचाऱ्यांच्या मान्यता प्राप्त संघटनाची यादी दि. 2 जाने 2017 नुसार कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.**



# समाज म्हणून एकत्र यावे : डॉ. उज्ज्वला दहिफळे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाच्या परंपरेला सार्वजनिक गणेशोत्सवाच्या रूपाने नवा आशय दिला, त्यामागी प्रेरणा स्वातंत्र्य चळवळीची होती. त्यांच्यापुढे 'स्वातंत्र्य' हे एका अर्थाने राजकीय मानले गेलेले ध्येय असले, तरी समाज म्हणून एकत्र यावे, आणि समाज म्हणूनच एक पाऊल पुढे टाकावे, ही त्यांची प्रेरणा मूळ सामाजिकच मानली पाहिजे. त्यामुळेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना जन्मतःच हा सामाजिक बांधिलकीचा संस्कार लाभला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात या मंडळांनी स्वातंत्र्याची चळवळ तळागाळापर्यंत नेली. दूरदर्शी नेते आणि सर्वसामान्य समाज यांना एकत्र आणणारा सेतू म्हणून काम केले. हजारो नेत्यांना त्यातून व्यासपीठ मिळाले; तसेच संगीत-नाट्य अशा अनेक कलांना या मंडळांनी लोकाश्रय मिळवून दिला आणि समाजाची सांस्कृतिक भूक भागविण्यासाठीही प्रयत्न केले आहेत, असे प्रतिपादन डॉ. उज्ज्वला दहिफळे यांनी व्यक्त केले. त्या महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या औरंगाबादेतील विभागीय कार्यालयात गुरुवारी त्यांच्या हस्ते श्री गणेशाची आरती करण्यात आली. या वेळी त्यांनी पत्रकारांशी सविस्तर चर्चा केली.

त्या पुढे म्हणाल्या की, त्याचबरोबर स्वातंत्र्यानंतरच्या काळातही वेगवेगळ्या देखाव्यांमधून जनतेचे प्रबोधन करण्याची परंपराही सार्वजनिक गणेशोत्सवाने जपली. या उत्सवात घडलेल्या कार्यकर्त्यांमधून वेगवेगळ्या स्तरांवरील राजकीय नेतृत्वाच्या पिढ्या जन्माला आल्या, हे एक मोठे योगदान आहेच. तसेच, हजारो कार्यकर्त्यांमध्ये हा परिसर, इथले लोक आपले आहेत, ही सामाजिक जबाबदारीची भावना याच उत्सवाने जागृत केली. मग परिसरातील एखादे माणूस आजारी पडले, किंवा अन्य काही घटना घडली, तर मध्यरात्रीही धावून येणारा हक्काचा कार्यकर्ता, ही माणुसकीच्या सन्मानाची ओळख याच उत्सवाने अनेकांना मिळवून दिली, असे म्हटले, तर वावगे ठरणार नाही. त्याबरोबरच सर्व धर्मांच्या नागरिकांनी उत्साहाने सहभागी होऊन सर्वधर्मसमभावाचे मूल्य जपण्याचेही कार्य या उत्सवाच्या माध्यमातून सर्वत्र घडत आहे, असे त्या शेवटी म्हणाल्या.

यावेळी बिल्डर अभिषेक बडे, राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, संघटक विलास शिंगी, उपाध्यक्ष छब्बुराव ताके, सुधीर कोर्टीकर, कोषाध्यक्ष मुकेश मुंदडा, ज्ञानेश्वर तांबे पाटील, अविनाश चव्हाण, प्रसिद्धी प्रमुख मनोज पाटणी, अनिल कुलथे आदींची उपस्थिती होती.

### आजच्या आरतीचे मान्यवर



**श्री गणेशाची शुक्रवार दि.२ रोजीची सायंकाळची आरती शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांच्या हस्ते होणार आहे, तरी पत्रकार बांधवांनी या आरतीच्या पावनप्रसंगी उपस्थित राहावे, अशी विनंती संघाच्या वतीने करण्यात आली आहे.**

# खोडेगाव विविध कार्यकारी सोसायटीवर फडकला भारतीय जनता पार्टीचा झेंडा

आधुनिक केसरी न्यूज



**कचनेर :** औरंगाबाद तालुक्यातील खोडेगाव येथे विविध कार्यकारी विकास सोसायटीची निवडणूक पार पडली. या निवडणुकीत कल्याण नाना गायकवाड यांची चेअरमनपदी व रंभाबाई घुसिंगे यांची व्हाईस चेअरमनपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

काही दिवसांपूर्वी खोडे गावच्या सोसायटीची निवडणूक पार पडली होती. निवडणुकीमध्ये कल्याण नाना गायकवाड यांच्या पॅनलने विरोधात उभे असलेल्या पॅनल ला अक्षरशः लोळवले होते व मोठा विजय मिळवला होता. आज चेअरमन व्हॉइस चेअरमनची निवड करण्यात आली. चेअरमनपदासाठी कल्याण नाना गायकवाड यांनी अर्ज दाखल केला तर व्हाईस चेअरमन पदासाठी रंभाबाई घुसिंगे यांनी अर्ज दाखल केला. यांच्या विरोधात कुठलाही अर्ज दाखल झाला नाही. निवडणूक निर्वाचन अधिकाऱ्यांनी कल्याण नाना गायकवाड यांचे चेअरमनपदी बिनविरोध निवड झाली याची घोषणा केली. घोषणा होतात गावांमध्ये मोठा जल्लोष करण्यात आला. फटाक्याची आतषबाजी करण्यात आली करण्यात आली. गावामध्ये मिरवणूक काढण्यात आली.

सोसायटीच्या संचालकपदी योगीता दत्तात्रय चौधरी, पन्नसिंग जोनवाळ, बाळासाहेब डिगोळे, दिलीप ढगे, प्रकाश ढगे, अशोक हुलसर, बद्रीनाथ हुलसर, गंगाबाई बहुरे, बापू वीर, तेजिराम सरोसे सर्वांची निवड झाली. यावेळी तिथे खोडेगाव चे सरपंच नारायण डिगोळे व उपसरपंच अंबरसिंग बहुरे व सर्व ग्रामपंचायत सदस्य ते उपस्थित होते. साईनाथ हूलसर यांनी चेअरमन, सर्व संचालकांना शुभेच्छा दिल्या.



**औरंगाबाद : आज क्रांती चौक वॉर्डमधील झांबड इस्टेट येथील स्व. मीनाताई ठाकरे सभागृह येथे मा.नगरसेविका शिल्पाराणी सागर वाडकर यांच्या पुढाकाराने आधार कार्ड आणि मतदान कार्ड लिंक करणे तसेच नवीन मतदार नोंदणी करणे याकरिता शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदरील शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. याप्रसंगी blo प्रकाश साळुंके यांची उपस्थिती होती.**

# सावळदबारा येथे गजानन महाराज पुण्यतिथी व ऋषी पंचमीनिमित्ताने महाप्रसादाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे आज दिनांक 1 सप्टेंबर 22 रोजी सद्गुरु श्री गजानन महाराज पुण्यतिथीनिमित्त व ऋषी पंचमी निमित्त सावळदबारा येथील श्री सद्गुरु गजानन महाराज मंदिर कोलते पाटील पेट्रोल पंपाजवळ देव्हारी रोड येथे मोठ्या थाटामाटात संपन्न करण्यात आला. मागील दोन वर्षाच्या कोविड-19 या महामारीमुळे सदरील ऋषीपंचमीचा कार्यक्रम हा रद्द करण्यात आलेला होता परंतु सावळदबारा येथील जे कालिंका देवी शिक्षण संस्था अध्यक्ष श्री भाऊराव लक्ष्मणराव कोलते यांनी आपल्या पेट्रोल पंपाजवळ उभारलेल्या भव्य अशा गजानन महाराज मंदिरामध्ये यावर्षी अन्नदाते सुदाम गोबरा राठोड शिक्षक व सरपंच पठाण तांडा यांनी आज महाप्रसादाचे आयोजन केले होते. भागातील अनेक वारकरी संप्रदायाच्या पालखी व दिंडी सोहळा या ठिकाणी येत असतो अनेक भक्तगण सद्गुरूंच्या चरणी आपले नवस फेडण्यासाठी येत असतात अनेक भक्तांचे सद्गुरूंच्या चरणस्पर्शाने जीवन धन्य झाले अशी चर्चा सदैव परिसरात चालू असते आणि नवसाला पावणारे हे मंदिर व येथील सुबक व आकर्षित मूर्ती माणसाचे मन मोहन घेते आणि साहजिकच त्याचे फळ हे अनेक भक्तगणांना या मंदिराच्या दर्शनाने लाभले आहे, अशी चर्चा परिसरामध्ये सतत चालू असते. दर गुरुवारी या मंदिरावरती अनेक भक्तगण आपल्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करतात हे विशेष दर गुरुवारी परिसरातील व सावळदबारा येथील सद्गुरु श्री गजानन महाराज भक्त या ठिकाणी सद्गुरु गजानन महाराज यांची बावन्नी वाचन करून आरतीने या कार्यक्रमाचा समारोप होतो व त्यानंतर महाप्रसादाचा वाटप होता. नवसाला पावणारे हे मंदिर म्हणून याची ख्याती आज परिसरामध्ये दुमदुमून गेलेला होता त्यामुळे दररोज सकाळ संध्याकाळ सुद्धा येते पूजा अर्चना चालत असते याचाच भाग म्हणून अन्नदाते सुदाम राठोड यांनी सहपरिवारासहित आज हा ऋषिपंचमी सोहळा सद्गुरु गजानन महाराज मंदिर येथे अन्नदानाच्या माध्यमातून साजरा केला. या सर्व कार्यक्रमासाठी गावातील अनेक भक्तगण व परिसरातील मंडळी सरळ हाताने मदत करतात.

यावेळी वारकरी संप्रदायाचे ह.भ.प.वासुदेव महाराज खडके, पंढरी महाराज सपाटे, सुनील महाराज राजपूत, भागवत महाराज महाजन, हभप.आबराव महाराज कोलते, बेलाप्पा पन्हाळे, बेलाप्पा कर्दळे, आनंदाप्पा चोपडे, रामचंद्र चिमणकर, सखाराम कोते, बाबू खांदे, भगवान टिकारे, सोपान मानकर, गजानन सुरपाटणे, दीपक गावडे,योगेश टिकारे,मयूर महाजन, हभप विशाल खडके, हभप किशोर गावडे व गावातील अनेक महिला संप्रदायाच्या भक्तगण उपस्थित राहतात, अशी माहिती प्राध्यापक जीवन कोलते (सामाजिक कार्यकर्ते) यांनी दिली.

# बिडकीन शेतशिवारात कृषी विभागाकडून कीटकनाशक औषधी व मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकिन :** राज्य शासन पुरस्कृत एकात्मीक कापुस उत्पादकता वाढ व मुल्य विकास योजने अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र औरगांबाद येथील कृषी शास्त्रज्ञांचा पथकाने भेट दिली असून पैठण तालुक्यासह बिडकीन गटातील शेत शिवारात कापूस पिकाची माहिती व प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली. यावेळी संबंधीत शेतकऱ्यांसोबत चर्चा करून मार्गदर्शन केले आहे.

यावेळी कृषी शास्त्रज्ञांनी कापूस पिकावरील गुलाबी बोंड आळी नियंत्रण या याविषयी मार्गदर्शन केले व शेतकऱ्यांनी कापूस प्लांटवर काम गंध सापडे लावावे व वेळोवेळी कापूस पिकात लक्ष देऊन निरीक्षण करीत राहावे. यावेळी संबंधित सर्व उपस्थित शेतकऱ्यांना व ज्या लाभधारक शेतकऱ्यांची नोंदणी होती, अशा सर्वांना प्रॉफिनो फास्ट व इमा नेटीन बेनझोएट या कीटक नाशक औषधीचे वाटप करण्यात आले व सोबतच कामगंथ सापळे, कीटकापासून बचाव करण्यासाठी वाटप केले आहेत.

तालुका कृषी अधीकारी संदीप शिरसाठ, कृषी मंडळ अधिकारी साळवे, बिडकीनच्या कृषी अधिकारी कारले, कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ झाडे व जिंतूरकर, ढाकेफळच्या कृषी सहाय्यक अधिकारी आरती दहीमिवाळ, कृषी पर्यवेक्षक लघाणे, प्रमोद रोकडे, सुनील चव्हाण, अशोक वाघचौरे, ज्योती शिंदे, सुनीता पोले, अपूर्वा पदमे यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनपर थेट शेतात हा मार्गदर्शन भेटी व औषधी व साधन वाटप करण्यात आले.

यावेळी सुनील दत्तात्रय शेटे, कान्होजी म्हसोबा ठाणगे, संताराम ठाणगे, राजु धर्मे, शेख रहेमान, योगेश ठाणगे, गोपीचंद ठाणगे आदी शेतकरी उपस्थीत होते.

# सार्वजनिक गणेशोत्सवाच्या उद्घाटनाचे औचित्य साधून आ.धनंजय मुंडेंनी शेरोशायरी करत फुंकले निवडणुकीचे रणशिंग

आधुनिक केसरी न्यूज

**परळी :** परळी मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आ.धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या नाथ प्रतिष्ठान आयोजित वैद्यनाथ सार्वजनिक गणेशोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना मुंडे यांनी केलेल्या शेरोशायरीवरुन आणि केलेल्या सुतोवाच भाषणातून त्यांनी आगामी परळी नगरपरिषद आणि विधानसभा निवडणुकीचे रणसिंग तर फुंकले नाही ना....?

गेल्या १८ वर्षांपासून चालत आलेल्या नाथ प्रतिष्ठान आयोजित १९ व्या वर्षीच्या वैद्यनाथ सार्वजनिक गणेश सार्वजनिक महोत्सवाच्या दहा दिवस चालणाऱ्या विविध कार्यक्रमांचे पहिल्या दिवशीचे उद्घाटन माजीमंत्री आ.धनंजय मुंडे व सुप्रसिद्ध सिनेअभिनेत्री अप्सरा आली. सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते काल रात्री अगदी जल्लोषात-धुमधडाक्यात पार पडले. मोंढा मार्केट येथे उभारण्यात आलेल्या भव्य वाटरप्रुफ मंडपामध्ये हजारोंच्या उपस्थितीत या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उद्घाटनानंतर बोलताना धनंजय मुंडे यांनी सुप्रसिद्ध शायर राहत इंदोरी यांच्या शेरोशायरीतील ऐक शेर सादर केला.

**राहत मे खतरे बहुत है,**
**लेकिन ठहरता कौन है...**
**मौत कल आती है, आज आ जाय डरता कौन है,**
**तेरे लष्कर के मुकाबले अकेला हू मै,**
**मगर फैसला मैदान मे होगा की मरता कौन है.....!!**

आ.धनंजय मुंडे यांनी सादर केलेल्या या शेरोशायरीला उपस्थित हजारो रसिकांनी आणि परळीकरांनी टाळ्यांच्या कडकडाटात जरीकरता उदंड प्रतिसाद दिला असला तरी तो शेर केवळ निमित्तमात्र असुन त्या माध्यमातून धनंजय मुंडे यांनी एक प्रकारे या शेरोशायरीतून माजीमंत्री पंकजा मुंडे यांचे नाव न घेता त्यांनी आगामी सर्वच निवडणुका लढण्यासाठी मी मैदानात सज्ज असल्याचे सूचक वक्तव्यच केले आहे. एवढेच नाही तर जणूकाही मीच पुन्हा येईन.....! असा सुतोवाचक ईशाराच दिला असे म्हटले तरी वावगे ठरू नये. समोर कितीही मोठी फौज असू द्या. पुन्हा विजयी मीच होणार असा आत्मविश्वासच त्यांनी या शायरीतून बोलून दाखविला.





**सांस्कृतिक कार्यक्रमाच्या आडून राजकीय इशारे**

नवे सरकार स्थिर होताच दोन-तीन महिन्यात परळी नगरपरिषदेची निवडणुक लागू शकते. तर येणाऱ्या एक-दीड वर्षात विधानसभेची रणधुमाळी सुरू होणार असल्याने या दोन्ही निवडणुका आ.धनंजय मुंडे यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आहेत म्हणूनच वैद्यनाथ सार्वजनिक गणेशोत्सवाच्या तयारीमध्ये आणि गर्दी खेचण्यामध्ये त्यांनी कोणतीही कमतरता ठेवली नाही. आणि मग या गर्दीचा फायदा घेत त्यांनी आपल्या मनातील राजकीय बेदर्दी उघडपणे बोलून दाखवली. एरवीच्या राजकीय गर्दीपेक्षा या महोत्सवानिमीत्ताने सांस्कृतीक कार्यक्रमांच्या रेलचेल मुळे जमलेल्या प्रचंड गर्दीचा बरोबर फायदा घेत त्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमात आपल्या प्राकृतिक स्वभानुसार बरोबर राजकीय फायदा साधला अशीही चर्चा ऐकावयास मिळते आहे.

**गर्दी खेचण्यासाठीचा हातखंडा मात्र कौतुकास्पदच....!**

सिने अभिनेते-अभिनेत्री, चला हवा येऊ द्या, महाराष्ट्राची हास्य जत्रा, आदर्श शिंदे, इंदुरीकर महाराज, महाराष्ट्रातील मराठी तसेच हिंदी चित्रपट सृष्टीतील आघाडीचे संगीतकार अजय-अतुल, त्याचबरोबर अमृता खानविलकर कवाली मुकाबला, सिने अभिनेत्री ईशा देवल, मानसी नाईक असे डझनभर पेक्षा जास्त कलाकारांना करोडो रुपये खर्च करून परळी मध्ये निमंत्रित केले आहे. जेणेकरुन सहकारी पदाधिकारी-कार्यकर्ते, महिला माता-भगिणी, सांस्कृतिक आवड असणारा प्रत्येक स्तरातील, रोजच्या धावपळीच्या धगधगीतून विरंगुळा शोधणारा जेष्ठ, प्रतिष्ठित वर्ग, व्यापारी वर्ग आणि उरलेला आंबट शौकीन वर्ग अशा सर्वसमावेशक रसिक-कलापासक वर्गाला आपल्याच गावात ऐक छदामही खर्च न होऊ देता आनंदोत्सवाची मेजवानी उपलब्ध करून देण्यात आणि त्या माध्यमातून बेफान गर्दी खेचून तुफान राजकीय फटकेबाजी करण्यात दर्दी धनंजय मुंडे यांचा हातखंडा कौतुकास्पद-वखाखण्याजोगाच.....!! तेंव्हा सतत असल्याचे नाचगाण्यांच्या कार्यक्रमांतून गर्दी खेचण्यासाठीचे बखुबी सुत्र त्यांना आता चांगलेच कळाल्याची चर्चाही मोआता मोठ्या चवीने परळी शहर व परिसरात कानावर पडत आहे.

या गणेशोत्सवाच्या माध्यमातून परळीकरांना सांस्कृतिक मेजवानी नक्कीच मिळणार आहे. परंतु याच माध्यमातून आगामी नगरपालिका आणि विधानसभा निवडणुकीचे रणशिंगही मुंडे यांनी फुंकले असुन काल केवळ सांस्कृतिक कार्यक्रमाच्या उद्घाटनाचे नारळ फोडले नसुन सोबत येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीसाठी आपण सज्ज असल्याचा ईशारा देत प्रचाराचेही नारळ फोडल्याचीच चर्चा जास्त प्रमाणात कानावर पडत आहे. तेंव्हा ऐका दगडात दोन पक्षी मारण्याचा मुळ छंद असणा-या आ.धनंजय मुंडे यांनी विरोधकांना म्हणजेच मुंडे भगिणींना यानिमित्ताने ऐक प्रकारे ईशाराच दिला आहे खरा, परंतु राजकीय पर्वणी ही मायबाप मतदारांच्या हाती असल्याने परळी विधानसभा मतदारसंघाचे राजकीय वास्तव हे येणारा काळच सांगेल हे ही तितकेच खरे......!!

# बायपासचा राजा थाटात विराजमान

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शहरातील देवानगरी-प्रतापनगर प्रभागाचा भाग असलेल्या स्वामी विवेकानंद नगर परिसरात यावर्षी 'एक गाव, एक गणपती' या धर्तीवर 'एक परीसर, एक गणपती' या विचाराने स्थापन झालेल्या 'बायपासचा राजा' चे ढोल-ताशा, डीजेच्या गजरात थाटात आगमन झाले. त्यानंतर विधिवत पूजा-आरती होऊन सायंकाळी ७:३० वाजता स्थापना झाली. मागील काही दिवसांपासून दडी मारून बसलेल्या पावसाने ही गणपती मिरवणुकीत जोरदार हजेरी लावली. पावसाच्या या जोरदार हजेरीत आणि गणेश उत्सवाच्या आनंदात चिंब भिजत परिसरातील गणेश भक्तांनी 'बायपासचा राजा'चे जोरदार स्वागत केले. जैन इंटरनॅशनल स्कुल पासून निघालेली स्वागत मिरवणूक परिसरात फिरत ओम सुपर शॉपीच्या बाजूला उभारण्यात आलेल्या गणेश मंडपापर्यंत पोहचल्यानंतर सायंकाळी ७:३० वाजता ५ जोडप्यांच्या विधिवत पूजेने 'बायपासचा राजा'च्या मूर्तीची प्रतिष्ठापणा झाली. आरती होऊन प्रसाद वाटप झाला. त्यानंतर 'यंग अँड फिट सिनिअर सीटीजन्स ग्रुप'चे अध्यक्ष खिवंसरा काका यांच्या हस्ते महाप्रसादाचे दाते चव्हाण कुटुंबीयांचा सत्कार करण्यात आला. यावेळी परीसरातील नागरिकांची सहकुटुंब उल्लेखनीय उपस्थिती होती.



'एक परिसर, एक गणपती' या विचाराने स्थापन झालेल्या 'बायपासचा राजा' गणेश मंडळाद्वारे या गणेशोत्सवात विविध सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. परिसरातील रहिवाशांच्या भेटीगाठी होऊन सामाजिक एकोपा, सलोखा वाढावा यादृष्टीने भजन, किर्तन, पोवाडा तसेच लहान मुलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या सांस्कृतिक, धार्मिक गणेशोत्सवाला रोज उपस्थित राहून सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष कैलास नरवडे आणि समस्त मंडळ पदाधिकारी, सदस्यांकडून करण्यात आले आहे.

# शिक्षकांना घाबरविण्यासाठी शिक्षण विभागाची 'शाळा'!

## भरारी पथके स्थापण्याची घोषणा; प्रत्यक्ष मैदानात मात्र उतरलेच नाहीत

आधुनिक केसरी न्यूज

**बहादुर चव्हाण**

**देव्हारी :** शाळेतील भौतिक सुविधांपासून शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी चालणाऱ्या उपक्रमांच्या पाहणीसाठी भरारी पथके नेमण्याची घोषणा जुलै महिन्यात करण्यात आली होती. ऑगस्ट महिन्यात ही पथके प्रत्यक्ष मैदानात उतरून शाळांची तपासणी करणार होती. मात्र, ऑगस्ट महिना उलटला तरी अशी पथकेच स्थापन करण्यात आली नसून, जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने फक्त शिक्षकांना घाबरविण्यासाठी तर ही 'शाळा' केली नसावी ना, अशी शंका उपस्थित होत आहे.

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून त्यांच्या शाळांसाठी विविध उपक्रम राबविले जातात.

काही शाळा मात्र या निर्णयाला खो देत उपक्रम राबविण्याबाबत दूरच राहतात. तर काही शाळा उपक्रम राबवित असल्या तरी त्याची योग्य अमलबजावणी शिक्षण विभागाच्या निदर्शनास आले होते. या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने भरारी पथके नेमून यापुढे शाळांची अचानक तपासणी करण्याचे ठरवले होते. शाळेचा परिपाठ, अध्यापन, विद्यार्थ्यांची उपस्थिती, क्षमता, शिक्षकांची उपस्थिती आदींची याअंतर्गत तपासणी करण्याचे निश्चित करण्यात आले होते.

सोबतच शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी राबवण्याच्या उपक्रमांबाबत ही पथके मार्गदर्शन करणार होती. या भरारी पथकात शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी आणि यांचा समावेश असणार असे सांगण्यात आले होते. मात्र, महिना उलटला तरी जिल्हा परिषदेचा शिक्षण विभागाला ही पथके स्थापन करण्यासाठी वेळ मिळालेला नाही. गेल्या महिनाभरात कोणत्याही शाळेची तपासणी देखील करण्यात आलेली नाही. विशेष म्हणजे ही पथके नेमकी कधी स्थापली जाणार आणि शाळांची तपासणी कधी केली जाणार, याबाबत सध्या कुणी बोलायला पण तयार नाही.



# महाधर्मगुरु पदाचा सातवा वर्धापन दिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** धर्मप्रांताचे मेषपाल महागुरस्वामी अम्ब्रोज रिबेलो यांच्या महाधर्मगुरु पदाचा सातवा वर्धपन दिन तसेच कॅथोलिक सभा औरंगाबाद संस्थेचा ७ वा वर्धापन दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. छावणीतील संत फ्रान्सिस डी सेल्स महामंदिरात पवित्र मिस्सा बलिदान अर्पण करण्यात आले पवित्र मिस्सा चे मुख्ययाजक ते स्वतः होते.

यावेळी त्यांनी सर्वांसाठी अभाराची प्रार्थना केली वेदीवर महामंदिराचे प्रमुख धर्मगुरु फा स्टीफन आल्मेडा, फा वॉल्टर गोन्सालविस, फा विलास पगँडो, फा लेस्ली रॉड्रीग्स व फा अँड्र्यू मोराएस उपस्थित होते. कॅथोलिक सभा औरंगाबाद संस्थेचे मार्गदर्शक महागुरस्वामी अम्ब्रोज रिबेलो यांच्या पावन हस्ते संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या विशेषांकांचे प्रकाशन करण्यात आले. बिशपांना विविध प्रतिनिधी च्या हस्ते सन्मानित करण्यात आले व त्यांचे अभीष्टचिंतन केक कापून करण्यात आले.

कॅथोलिक सभा औरंगाबाद संस्थेची स्थापना २७ ऑगस्ट २०१५ मध्ये झाली आहे. संस्थेमार्फत अनेक सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. त्यात विशेषतः वधूवर सूचक मेळावा आयोजित करण्यात आला. कोविड काळात विवीध गरजवंताला मदत करण्यात आली. आजपर्यंत समाजातील शिक्षण, धार्मिक, साहित्य अशा विविध प्रकारच्या मान्यवराना समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. कार्यक्रमाची प्रस्तावना संस्थेचे सचिव राजेंद्र दुशिंग यांनी केले. संस्थेचा ७ वा वर्धापन दिन असल्याने संस्थेचे अध्यक्ष एफ एम शिनगारे यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेताना जुन्या आठवणींना उजाळा दिला. शेवटी उपाध्यक्ष नानासाहेब जाधव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. यावेळी मोहन गणराज सुनील त्रिभुवन, साहेबराव शिनगारे, संजय शेळके, संजय रुपेकर, संजय थोरात, अजय हिवाळे,उत्तम केदारे, आदि सदस्य समाजातील बहुसंख्य लोक उपस्थित होते.





## औरंगाबादची गणेश मंदिरे

# संस्थान गणपती, राजाबाजार

आधुनिक केसरी

संस्थान गणपतीचे पूर्वी छोटेसे मंदिर होते. 1985 साल पासून या मंदिराचा जिर्णोद्धार सुरू झाला. 1988 मध्ये संस्थान गणपतीची प्रतिष्ठापना करण्यात आली. औरंगाबादच्या सर्व लोकांची अपार श्रद्धा असणारी ही संस्थान गणेशाची मूर्ती दोन फूट उंचीचे असून स्वयंभू स्वरूपाची आहे. ओंकार स्वरूपातील शेंदूर वर्णीय हा गणेश आहे. 1988 मध्ये जीर्णोद्धार झाल्यानंतर संपूर्ण मंदिर हे संगमरवरी बांधण्यात आले. मंदिराची उंची 25 फूट रुंदी 90 फूट आहे.



सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312

औरंगाबाद शहरवासी यांचे आराध्य दैवत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संस्थान गणपती मंदिरात नित्य नियमित नियमाने पूजा-अर्चा, नैवेद्य, आरती, मंत्रघोष अथर्वशीर्षाची आवर्तने, अभिषेक.. असे धार्मिक विधी होत असतात. प्रत्येकाच्या हृदयात भक्तीरूपाने वसलेला संस्थान गणपती सर्व औरंगाबाद गणपतीचा हा गणाधिपती आहे. म्हणूनच गणरायाच्या मिरवणुकीची सुरुवात देखील याच मंदिरापासून केली जाते. गणेश महासंघाच्या मान्यवराकडून गणेशाची प्रतिष्ठापना करतानाही पहिला मान संस्थान गणपतीला दिलेला आहे.



गणेशोत्सवाच्या दहा दिवसात रोज येणाऱ्या भक्तांना जेवण देण्याची परंपरा मंदिराच्या विश्वस्थानी सुरू केलेली आहे. रोज दहा हजाराहून अधिक लोक या अन्नदानाने तृप्त होऊन एक आत्मिक श्रद्धेने परत घरी जातात. संस्थान गणपती मंदिरातर्फे सामाजिक संस्थांनाही मदत केली जाते. अनेक गरीब होतकरू मुलांनाही मदत दिली जाते. गरजू गरीब आजारी रुग्णांना मदतीचा हात.. तसेच होतकरू खेळाडू महिला मुलांना योग्य ती मदतही आजपर्यंत या मंदिर समितीने केलेली आहे. अनेक गरजू गरीब लोकांसाठी एक मोफत रुग्णालय देखील सुरू केलेले आहे. त्याचबरोबर हुशार गरीब विद्यार्थ्यांसाठी मोफत वाचला नाही सुरू करण्यात आलेले आहे. त्याचबरोबर भविष्यात खूप मोठे मंगल कार्यालय उभे करून गरीब लोकांना अगदी नाममात्र दरात त्यांच्या मंगला कार्याची सोय आम्ही करणार आहोत असे  मंदिराच्या पदाधिकाऱ्यांनी आमच्याशी बोलताना सांगितले. भक्तगणांची अपार श्रद्धा असलेल्या या संस्था गणपतीचे रूप काय वर्णव... रत्नजडित सोन्याचा माथ्यावर लखलखणारा मुगुट.. गळ्यात रत्नांचे माणिक मोत्यांचे अगणित अलंकार.. पायात मडवलेले अलौकिकतोडे.. अशा सुवर्णअलंकाराने सजलेले संस्थान गणेशाचे नयनरम्य पाहून एक आत्मिक समाधान मिळवू जाते. मग अशा गणेशाच्या दर्शनाने भक्तगण भारावून जातात... आत्मिक समाधानानी तृप्त होतात.. मग आपलं जीवन कृतार्थ झाल्यासारखं वाटतं आणि त्याच भावनेने ते आपल्या घरी परततात. औरंगाबाद शहराचे ग्रामदैवत म्हणून संस्थान गणपती प्राचीन व ऐतिहासिक महत्त्व आहे.

गणेशोत्सवात सार्वजनिक रूप्राप्त करून देणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक औरंगाबादला कोर्टाच्या निमित्ताने आल्यानंतर संस्थान गणपतीचे दर्शन घेतल्यावरच कोर्टात जात असत. 1988 साली शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी संस्थान गणपती नवस केलेला होता. त्यांची मनोकामना पूर्ण झाल्यावर 1991 त्यांनी या गणपती सोन्याचा मुकुट अर्पण केला. संस्थान गणपतीच्या बाबतीत आणखीन एक आनंदाची बातमी अशी की जवळच असणारी जमीन त्यांनी घेतलेली आहे आणि त्यावर खूप मोठा मंदिराचा विस्तार केला जाणार आहे, असेही मंदिरांच्या पदाधिकाऱ्यांनी आम्हा सांगितले.




औरंगाबाद : बेगमपुरा भागातील चॅम्पियन क्रिडा मंडळाचे प्रशिक्षक सचिन डंगारे व अन्नक्षेत्रचे सदस्य मुकुंद टिपकरी यांच्या साहाय्याने तेथील खेळाच्या मैदानावर तेथील खेळाडूंना अन्नक्षेत्र या संस्थेमार्फत चॉकलेटचे वाटप करण्यात आले. अन्नक्षेत्र ही भारतभर गरजवंतांना विविध प्रकारचे अन्नाचे वाटप करते. यावेळी स्वातंत्र्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष असल्याने मुला, मुलींसाठी चॉकलेट पाठवण्यात आले आहेत त्याचे वाटप करण्यात आले व सर्व मुलांना अन्नाचे महत्त्व पटवून दिले. या कार्यक्रमात चॅम्पियन क्रिडा मंडळाचे अभय भंडारी, सागर ढटिंग व इतर सहकाऱ्यांनी वाटपात मदत केली.

# दारुच्या नशेत इमारतीच्या खिडकीतून उतरण्याचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** दारूच्या नशेमुळे एकाला आपला जीव गमवावा लागला आहे. या घटनेचा व्हिडिओ देखील सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. सोसायटीच्या पाचव्या मजल्यावरून खिडकीतून उतरण्याचा प्रयत्न करत असताना त्याचा तोल जाऊन तो खाली जमिनीवर कोसळला. या घटनेत संबंधित व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. अनिल कांबळे (वय ५०) असे संबंधित व्यक्तीचे नाव असून पिंपरी चिंचवड येथील निगडी परिसरात राहणाऱ्या प्रेरणा सोसायटीमध्ये हा प्रकार घडला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अनिल कांबळे या व्यक्तीने घराच्या खिडकीमधून एक कापड बाहेर टाकले. या कापडाच्या सहाय्याने तो खाली उतरण्याचा प्रयत्न करत होता. पाचव्या मजल्यावरून खाली उतरत होता. काही वेळ प्रयत्न केल्यानंतर त्याचा तोल जाऊन तो पाचव्या मजल्यावरून खाली कोसळला आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला आहे.

# शिक्षक व पदवीधर मतदारसंघ कायमस्वरूपी रद्द करा : आ. प्रशांत बंब

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूर/खुलताबादचे आ.प्रशांत बंब यांनी शिक्षक व पदवीधर आमदारक्या कायमस्वरूपी रद्द करण्यात याव्या, अशी मागणी केली आहे. आ. प्रशांत बंब आणि शिक्षक संघटना यांच्यातील संघर्ष टोकाला पोहचला आहे. मुख्यालयी न राहता घरभाडे उचलणारे शिक्षक शासनाची फसवणूक तर करतच आहेत पण आमच्या पिढ्या देखील बरबाद करत आहेत, असा गंभीर आरोप आमदार बंब यांनी केला आहे. शिक्षक संघटनांनी देखील बंब यांच्या आरोपांना जशासतसे उत्तर देण्याची भूमिका घेतल्याने हा संघर्ष अधिकच चिघळत चालला आहे. मात्र आमदार बंब यांनी आधी विधानसभेत कमी शिकलेले आमदार असायचे  त्यामुळे शिक्षक, प्राध्यपकांचे प्रश्न मांडण्यासाठी या मतदारसंघाची निर्मिती करण्यात आली होती. आता बहुतांश आमदार हे शिकलेले सुशिक्षित आहेत, त्यामुळे शिक्षक, मराठवाडा पदवीधर मतदारसंघाची गरज राहिलेली नाही, असा दावा करून सगळेच नाही पण, बहुतांश शिक्षक, पदवीधर खोटी काम करणारे, खोटी कागदपत्र तयार करणारे, लोकप्रतिनिधींवर दबाव आणण्यासाठी गुन्हे दाखल करणाऱ्या शिक्षकांना पाठिशी घालायचे काम करत आहेत. त्यामुळे त्यांची आता या मतदारसंघाची गरज राहिलेली नाही आपण आमदारांची संख्या तितकीच ठेवण्यासाठी शेतकरी, सरपंच यांच्यातून आमदार मतदार संघ काढून अन्य मार्ग काढू शकतो, असेही सुचवले आहे. सगळे शिक्षक मुख्यालयी राहतात, त्यांना आपल्याच मुलांसमोर शिकवायला संकोच वाटतो, असे मत काही शिक्षक आमदार व्यक्त करून आमच्या पिढ्या बरबाद करणाऱ्या शिक्षकांना पाठिशी घालत आहेत. एकदा जाऊन पहा ८० टक्के शिक्षक मुख्यालयी राहत नाहीत, असा दावा देखील बंब यांनी केला.

# सोयाबीनवर मोझॅक रोगाची साथ फवारणी करा

## सोयगाव कृषी विभागाचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात सध्या मोठ्या प्रमाणात विषाणूजन्य रोग हिरवा मोझॅक रोगग्रस्त सोयाबीन झाडांची वाढ खुंटलेली दिसते. पाने आखूड, लहान, जाडसर व सुरकुतलेली होतात. अशा झाडांना शेंगा कमी व त्याही सुरकतलेल्या लागतात. शेंगात दाणे कमी व बारीक भरतात. शेंगा भरण्याच्या स्थितीत रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास बियाण्यावरही परिणाम होतो. बियाण्याच्या आवरणाचा रंग बदलून करडा तपकिरी काळपट होत चालला आहे.या रोगाचा प्रसार मावा किडीद्वारे व बियाण्यापासून होतो. हिरवा मोझॅक रोगाच्या प्रादुर्भावामुळे उत्पादनात २५-५० टक्क्यांपर्यंत शेतकऱ्यांना घट येण्याची शक्यता आहे. अशा अंदाज सोयगाव कृषी विभागाचे तालुका कृषी अधिकारी एस.जी.वाघ यांनी केला आहे.

सोयाबीनवर पिवळा मोझॅक रोगात झाडाचा काही भाग हिरवट तर काही भाग पिवळसर दिसून येतो. शेंड्याकडील पाने पिवळी पडून, आकाराने लहान राहतात. यामध्ये दाणेसुद्धा कमी राहतात. पांढऱ्या माशीद्वारे रोगाचा प्रसार होतो. या रोगाच्या प्रादुर्भावामुळे उत्पादनात ५-९० टक्क्यांपर्यंत घट येते. व्यवस्थापन उगवणीनंतर १० ते १५ दिवसांनी १५३० सें.मी. आकाराचे एकरी ६० पिवळे चिकट सापळे लावावेत.



पेरणीनंतर २५ दिवसांनी निंबोळी अर्क ५% किंवा ॲझाडिरेक्टिन (१०,००० पीपीएम) ३-५ मि.लि. प्रतिलिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. शिफारशीप्रमाणे संतुलीत खताची मात्रा द्यावी. नत्राचा अतिरीक्त वापर टाळावा. शेत, बांधावरील तणे काढून नष्ट करावीत. सुरवातीला अत्यल्प प्रमाणात असलेली रोगग्रस्त झाडे दिसताच उपटून टाकावीत. मित्र कीटकांचे संवर्धन करावे. उन्हाळी सोयाबीन पीक घेऊ नये. रोग प्रसार करणाऱ्या रसशोषक किडींच्या नियंत्रणासाठी, बीटा सायफ्लुथ्रिन (८.४९%) + इमिडाक्लोप्रीड (१९.८१% ओडी) ०.७ मि.लि. किंवा थायमिथोक्झाम (१२.५%) + लॅमडा सायहॅलोथ्रीन (९.५% झेडसी) ०.२५ मि.लि. प्रतिलिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी, अशी माहिती सोयगाव कृषी विभागाचे कृषी सहाय्यक हेमंत देशमुख, कृषी सहाय्यक मानसिंग भोळे, कृषी पर्यवेक्षक अमोल महाजन यांनी दिली.

# प्रलंबित विकास कामाला गती मिळणार, निधी उपलब्ध करून देणार : खासदार जलील

आधुनिक केसरी न्यूज




**पिशोर :** कन्नड तालुक्यातील नादरपुर येथे पंतप्रधान ग्राम सडक योजनेअंतर्गत नादरपुर-जवखेडा, जवखेडा-सारोळा, नादरपूर-पिशोर या रस्त्याचे भूमिपूजन गुरुवार रोजी औरंगाबाद जिल्ह्याचे खासदार इम्तियाज जलील यांच्या शुभहस्ते अत्यंत उत्साहात करण्यात आले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद सदस्या संजना जाधव या होत्या. याप्रसंगी पंचायत समिती कन्नड माजी सभापती आप्पाराव घुगे, आम आदमी पक्षाचे तालुका अध्यक्ष सुभाषराव निकम, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष संजय निकम, कार्यकारी अभियंता खेडकर, पिशोर ग्रामपंचायत उपसरपंच बाळासाहेब जाधव, नादरपूर ग्रामपंचायत सरपंच सविताताई निकम, दिलीप निकम, उपसरपंच सागर निकम, गणेश बाबा बाबुराव निकम, ग्रामपंचायत चे सर्व सदस्य जवखेडा सारोळा पिंपरखेडा गौर पिंपरी या गावचे सर्व सरपंच, उपसरपंच, नादरपुर गावातील सर्व शेतकरी उपस्थित होते.

याप्रसंगी खासदार जलील यांनी नादरपूर ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक आम आदमी पक्षाचे तालुकाध्यक्ष सुभाष निकम यांनी केले. याप्रसंगी आपल्या प्रास्ताविक भाषणात नादरपूर येथील जिल्हा परिषद शाळेत कॉम्प्युटरसाठी खासदार जलील यांच्याकडे मागणी केली असता खासदार यांनी दहा कंप्युटरची तात्काळ घोषणा केली. त्याचप्रमाणे शाळा दुरुस्तीसाठी व शाळेच्या इतर कामांसाठी भरपुर निधी उपलब्ध करून, ग्रामीण भागातील रस्त्याच्या कामाला गती मिळणार, त्याचसोबत गावातील विविध कामासाठी निधीही देणार असल्याचे आश्वासन दिले. त्याचप्रमाणे नादरपुर व पंचक्रोशीतील सर्व विकास कामास भरपूर प्रमाणात निधी देऊन सर्व कामे मार्गी लावू असे आश्वासन खासदार इम्तियाज जलिल यांनी दिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मण बळी यांनी केले व आभार नादरपुरचे सरपंच निकम यांनी केले.यावेळी खरात कॉंट्रेशनचे अमोल खरात, विविध सेवा सोसायटी चे चोन्धे यांच्यासोबत ग्रामस्थांची मोठ्या संखेने उपस्थिती होती.

# गणेश भक्तांना मनोज पवार यांच्यातर्फे वृक्ष भेट

## एक गणपती एक झाड या संकल्पनेने सर्वत्र कौतुक

आधुनिक केसरी न्यूज




**कन्नड :** येथील उद्योजक मनोज पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक कार्यकर्ते संतोष बनकर निसर्गप्रेमी विकास बनकर यांची एक नवीन संकल्पना (एक मुर्ती एक झाड...!) राबविण्यात आली.

यावेळी उद्योजक मनोज पवार यांच्या हस्ते सर्व गणेश भक्त गणपती मुर्ती घेऊन जाताना वृक्ष देऊन शुभेच्छा ही देण्यात आल्या. या अनोख्या संकल्पनेने सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी शहरप्रमुख सुनिल, डॉ. सदाशिव पाटील, संदीप नरवडे, योगेश त्रिभुवन, मनोज देशमुख, अमोल पवार, मा. नगरसेवक विक्रम पाटे, सोमिनाथ दाभाडे, शुभम नागरे, शुभम कवडे, जितु शिरसाठ इत्यादींची उपस्थिती होती.

# लातुरात चक्क झाडाचा गणपती !

## कापसाचे हात, धोती, फेटा आणि सुपाचे कान; पाहण्यासाठी नागरिकांची प्रचंड गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** झाडे लावा, झाडे जगवा हा संदेश देण्यासाठी वसुंधरा प्रतिष्ठानच्या वतीने 2017 वर्षापासून लातूर शहरात चक्क झाडाचा गणपती साकारला जातो. या माध्यमातून मी देवळात नाही, मी दगडात नाही, तर मी झाडात आहे हा संदेश हा वृक्षरूपी गणराय देतो आहे. एका झाडाला सुपाचे कान, फेटा, कापसाचे हात, धोतर परिधान करून गणरायाचे रूप दिले जाते.

सदर वृक्षरूपी गणराय लातुरातील राजीव गांधी चौक परिसरात साकारण्यात आला आहे. हा आगळावेगळा झाडाचा गणपती पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी होत आहे. याशिवाय गणेशोत्सव काळात वसुंधरा प्रतिष्ठानच्या वतीने एक गणेश मंडळ:21 वृक्ष हा उपक्रम राबवून गणेश मंडळांना मोफत 8 ते 10 फूट उंचीची झाड उपलब्ध करून देण्यात आली आहेत. वृक्षोत्सव हा गणेशोत्सव हा संदेश या माध्यमातून दिला जात असून, गणेशोत्सव च्या पहिल्याच दिवशी गणेश मंडळांना 1100 झाडांचे मोफत वाटप करण्यात आले. भर पावसात या वृक्षरूपी गणरायाची स्थापना करण्यात आली. या माध्यमातून वृक्षांची चळवळ मनामनात रुजविण्याचा प्रयत्न करण्यात येतो आहे. सदर वृक्षरूपी गणराय पाहण्यासाठी आणि डोळ्यांत साठविण्यासाठी नागरिक मोठी गर्दी करीत आहेत. विधिवत पूजा करून या वृक्षरूपी गणरायाची स्थापना करण्यात आली. यावेळी वसुंधरा परिवारातील प्रा.योगेश शर्मा, उमाकांत मुंडलीक, रामेश्वर बावळे, अमोलआप्पा स्वामी, डॉ.अजित चिखलीकर, राहुल माशाळकर, संतोष धनुरे, शिवाजी निरमनाळे, गौस मणियार, अभिजित स्वामी, समर्थ स्वामी, प्रमोद इजारे आदींची उपस्थिती होती.

**गणेश मंडळांना सोबत घेऊन गणेशोत्सव काळात वृक्ष लागवड मोहीम**

गणेशोत्सव काळात वृक्षोत्सव हाच खरा गणेशोत्सव ही मोहीम वसुंधरा प्रतिष्ठानने हाती घेतली असून, या अंतर्गत गणेश मंडळांना मोफत 8 ते 10 फूट उंचीची झाड प्रतिष्ठानकडून दिली जात आहेत. गणेशोत्सवच्या पहिल्याच दिवशी 1100 झाडांचे वितरण गणेश मंडळांना करण्यात आले. झाडात प्रामुख्याने वड, पिंपळ, कडुनिंब, आकाश मोगरा, मोहगणी, आंबा, चिकू, बेल आदी झाडांचा समावेश आहे. गणेश मंडळांना सोबत घेऊन बाप्पांच्या नावाने हजारो झाडांची लागवड आणि संवर्धन केली जाणार आहे. अनेक गणेश मंडळांनी या गणेशोत्सव काळात वृक्ष लागवड आणि संवर्धन करण्याचा निर्धार केला असून, वसुंधरा प्रतिष्ठानने मोफत वृक्ष उपलब्ध करून दिल्याबद्दल मंडळांनी आभार मानले आहेत.




**ना डॉल्बी, ना साउंड सिस्टीम ना मिरवणूक...100 टक्के पर्यावरण पूरक 'लातूर पॅटर्न'**

गणेशोत्सव म्हणलं की डॉल्बी, साउंड सिस्टीम आणि मिरवणुका काढल्या जातात. या सर्व गोष्टींना फाटा देत वृक्षांची चळवळ प्रत्येकाच्या अंतःकरणात रुजावी या हेतूने वसुंधरा प्रतिष्ठान 2017 पासून झाडाचा गणपती साकारतो. झाडाला गणपती बाप्पाचे रूप देऊन देव झाडात आहे, त्यामुळे निसर्ग रक्षण करा असा संदेश दिला जातो. हा वृक्षरूपी गणराय 100 टक्के पर्यावरण पूरक असून, याची चर्चा महाराष्ट्र भर सुरू आहे. लातूरला वनांचे क्षेत्र कमी आहे. मात्र, निसर्ग संवर्धनाचा लातूर पॅटर्न आता निर्माण झाला असून, वृक्षांची चळवळ आता लोकचळवळ होते आहे.

**फलकांच्या माध्यमातून विविध विषयांवर जनजागृती..., प्रसाद म्हणून वृक्ष भेट**

शहरातील राजीव गांधी चौक परिसरात हा वृक्षरूपी गणराय विराजमान आहे. हा अनोखा गणपती डोळ्यांत साठविण्यासाठी नागरिक गर्दी करीत आहे. या वृक्षरूपी गणेशोत्सव ठिकाणी विविध विषयांवर जनजागृती करण्यासाठी फलक लावण्यात आले आहेत. एका भल्या मोठ्या फलकावर लातूरचा दुष्काळ, रेल्वेने पाणी आणण्याची आलेली दुर्दैवी वेळ तर एका बाजूला हरित लातूर दर्शविण्यात आले आहे. याशिवाय पाणी वाचवा, मुलगी वाचवा, मतदान जनजागृती, रक्तदान जनजागृती, सामाजिक एकता आदी विषयांवर फलकांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. यासोबतच, आलेल्या प्रत्येक भाविकास एक फळझाड प्रसाद म्हणून भेट दिला जातो आहे.

## महापुरुषांना जातीच्या चष्म्यातून पाहू नका : डॉ.धोंडोपंत मानवतकर

आधुनिक केसरी न्यूज

**मंठा :** सर्वच महापुरुषांचे कार्य हे देशातील जनतेच्या हितासाठी होते म्हणून त्यांना कुठल्याही एका जातीत बंदिस्त करु नका, किंवा त्यांना जातीच्या चष्म्यातून पाहू नका, असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक डॉ.धोंडोपंत मानवतकर यांनी केले. यावेळी पुढे बोलतांना डॉ.धोंडोपंत मानवतकर म्हणाले की, साहित्यरत्न अण्णा भाऊसाठे यांची जयंती आता नाचून नव्हे, तर वाचून साजरी करण्याची गरज आहे.

केदार वाकडी (ता.मंठा) येथे दि.२९ ऑगस्ट रोजी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची १०२ वी जयंती साजरी करण्यात आली. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज क्रांतिवीर लहुजी साळवे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. पाहुण्यांच्या स्वागतानंतर भाषणाच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते रंगनाथ बापु वटाणे म्हणाले की, "मातंग समाजाने सर्वांगिण परिवर्तनासाठी धर्मांतराच्या दिशेने पावलं टाकण्याची गरज आहे. "जग बदल घालुनि घाव, सांगून गेले मला भीमराव" अण्णाभाऊचे हे गीत परिवर्तनाच्या चळवळीचा विचार मांडणारे आहे. याचा विचार मातंग समाजाने केला पाहिजे.



दुपारी ४ वाजता साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनचरित्रावर उपस्थितांनी आपले विचार मांडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केदार वाकडी येथील माजी सरपंच केदारी पवार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध साहित्यिक डॉ.धोंडोपंत मानवतकर व रंगनाथ बापू वटाणे हे उपस्थित होते. गावातील प्रतिष्ठित नागरिक महेश कव्हळे, कृष्णा कव्हळे, विष्णू कव्हळे, अंगद कव्हळे यांच्यासह राजेश तांबे, पिराजी हजारे, जयभीम सेनेचे उध्दव सरोदे, पिराजी पवळे, प्रभाकर कांबळे आदी कार्यकर्ते आवर्जून उपस्थित होते. सूत्रसंचालन रमेश आठवे यांनी केले, तर गजानन पवार यांनी आभार मानले. सायंकाळी ६ वाजता अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी जवळपासच्या खेड्यातील अनेक तरुण सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संतोष पवार, अशोक हातागळे, किशोर पवार, राजेश वाघमारे, ओम पवार, शिवाजी थोरात, गजानन पवार, अनिल कांबळे, अशोक पवार, राजेश लोंढे, विक्रम पवार, दत्ता पवार, अजय पवार, संदीप पवार आदी तरुणांनी परिश्रम घेतले.

## ऑलिम्पिक संघटनेकडून क्रीडा दिनानिमित्त सत्कार

आधुनिक केसरी न्यूज


**औरंगाबाद :** ऑलिम्पक संघटनेकडून क्रिडा दिनानिमित्त अभिषेक गणोरकर यांचा व्हॉलीबॉल खेळामधून आदर्श क्रीडा मार्गदर्शक तर अदिती बागुल व प्रमोद जेथे राष्ट्रीय खेळाडू म्हणून पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला.

अनेक राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय खेळाडू घडवले व व्हॉलीबॉल खेळाच्या प्रचार करून व्हॉलीबॉल बद्दलची कार्याची दखल घेत औरंगाबाद ऑलिम्पिक संघटनाकडून आदर्श क्रिडा मार्गदर्शक पुरस्कार मंत्री आमदार अतुल सावे व ओलिम्पक खेळाडू दतू भोकनल यांच्या हस्ते अभिषेक गणोरकर यांना देऊन सत्कार करण्यात आला तसेच राष्ट्रीय खेळाडू अदिती बागुल व राष्ट्रीय खेळाडू प्रमोद जेठे यांचा सत्कार क्रिडादिनानिमित करण्यात आला.


## शनैश्वर मित्र मंडळाच्या लाडक्या बाप्पांचे धूमधडाक्यात आगमन, प्रतिष्ठापना

आधुनिक केसरी न्यूज

**फागणे :** ढोलताशांचा गजर, गुलालाची उधळण, टाळ्यांचा नाद आणि मोरया... मोरयाच्या गजरात फागणे गावात उत्साही वातावरणात श्री गणेशाचे आगमन झाले. श्री शनेश्वर मित्र मंडळाच्या गणरायाचे आगमनही उत्साही व भक्तिमय वातावरणात झाले. गणरायाचे जयघोषात स्वागत केल्यानंतर विधीवत प्रतिष्ठापना करण्यात आली. गणरायाच्या मंडपातील रंगबिरंगी रोषणाई आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरली. शनेश्वर मित्र मंडळाच्या सर्व तरुणांनी पारंपारिक वादावर नाचत गाजत फटाक्यांची आतिषबाजी करत जल्लोषात आपल्या लाडक्या गणरायाचे स्वागत ही केले. तसेच सायंकाळी गणरायाची प्रतिष्ठापना केल्यानंतर सामूहिक महाआरती करून आपल्या लाडक्या बाप्पाला वंदन करण्यात आले. मोदकांचा नैवेद्य गणरायाला अर्पणही करण्यात आले त्यानंतर सर्वांनी नैवेद्य प्रसाद म्हणून ग्रहण केला. तसेच दरवर्षाप्रमाणे याही वर्षी विविध धार्मिक कार्यक्रमाचे श्री शनेश्वर मित्र मंडळाच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे.



## सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

### हनिमून...

आधुनिक केसरी

**हनिमून शब्दाची उत्पत्ती**

" मीड" नावाच्या ड्रिंकपासून याची सुरुवात झाली. इंग्लंडमध्ये सुरुवातीच्या काळात लग्नाच्या वेळी जोडप्याला एक पेय दिलं जात असे. ज्यात मुख्यतः भरपूर प्रमाणात मध (हनी) पाणी आणि काही मसाले (स्पायसेस) यांचं मिश्रण केलेलं असे. यामध्ये उत्साहवर्धक आणि जननशक्ती वाढवणाऱ्या घटकांचा समावेश केलेला असे. हे पेय लग्न झाल्यापासून दररोज रात्री पौर्णिमेपर्यंत म्हणजेच चंद्राचे पूर्ण दर्शन होऊ पर्यंत दिले जात असे. म्हणून याला हनी म्हणजे मध आणि मून म्हणजे चंद्र, पौर्णिमा असं म्हटलं गेलं. अशा पद्धतीने या हनिमून शब्दाची उत्पत्ती झालेली आहे.

**हनिमूनचा हेतू काय ?**

दैनंदिन धावपळीच्या जीवनातून थोडसं बाजूला जाऊन या लग्नादरम्यान, सगळ्यांच्या गाठीभेटीतून थोडसं एकांत मिळण्यासाठी तयार करण्यात आलेली एक प्रथा म्हणजे हनिमून.

**हे फक्त लग्नानंतर एकदाच करायचे असते का ?**

खरं म्हणजे लग्नाच्या प्रत्येक वाढदिवसाला हा हनिमून साजरा होणं आवश्यक आहे. म्हणजेच खरं हनी आणि खरा मून तयार होत राहील आणि तो आयुष्यभर टिकेल. जेव्हा हनीमधला गोडवा आणि मूनमधील चंद्रकलेचा अंतर होतो त्यावेळी मग ग्रहण लागतं आणि तुमच्या आयुष्यातील सुखी जीवनाच्या मंत्राची गुरुकिल्ली काय हे शोधावं लागतं.

**हनिमूनचे समानार्थी शब्द**

१. आनंद मास २. मधु मास ३. सुहाग मास ४. सुहाग रात ५. प्रमोद काल ६. मधुर चंद्र

**हनिमूनला गेल्यानंतर काय कराल ?**

**१. एकमेकांना ओळखा, जवळीक वाढवा :** आता खर तर आजकाल हा प्रश्नयेत नाही. कारण बऱ्याच वेळा लग्नाच्या आधी गाठीभेटी होत असतात त्यात ओळख झालेली असतेच. मात्र जेव्हा तुम्ही हनिमूनला जाल तेव्हा तिथे गेल्यानंतर लगेचच सेक्सची घाई न करता पहिल्यांदा एकमेकांशी बोला, चर्चा करा. एकमेकांच्या आवडी-निवडी, छंद याबद्दल जाणून घ्या. जसं एकमेकांना आवडतं तसं राहण्याचा प्रयत्न करा. खाण्या पिण्याच्या आवडी जाणून तशा पद्धतीचे पदार्थ मागवा आणि अगदी प्रेमानं, आपुलकीने ते ग्रहण करा. म्हणजे खा.. म्हणजे थोडक्यात जवळीक वाढवा, स्नेह, आदर, आपुलकी, प्रेम हे सर्व आपोआप निर्माण होतं आणि मग हळूहळू दोघांतील अंतर कमी होऊन त्याच रूपांतर शरीर एक होण्यात होतं. **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

## शिर्डीला पावसाचा फटका

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** शहरात गुरुवारी पहाटेच्या सुमारास झालेल्या मुसळधार पावसाने दाणादाण उडवून दिली आहे. एकीकडे शहरातील लोकवस्तीत पावसाचे पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले असतानाच साईबाबा संस्थानच्या विविध आस्थापनांना देखील पावसाचा फटका बसला आहे. साई प्रसादालय, शासकीय विश्रामगृह, पोलीस उपविभागीय कार्यालय यासोबत संस्थानच्या साईनाथ हॉस्पिटलमध्ये पाणी शिरल्याने रूग्णालय प्रशासनाची एकच धावपळ उडाली.

साई संस्थानच्या साईनाथ हॉस्पिटल परिसर तसेच तळमजल्यावर पावसाचे पाणी घुसले आहे. आसपासच्या गावातील ओढ्या-नाल्यांमधील पाण्याला वाट न मिळाल्याने त्या पाण्याने रूग्णालय परिसर व्यापून टाकला आहे. सकाळी ६ वाजेनंतर हळुहळू पाण्याने तळमजल्यावर शिरकाव केल्यानंतर तेथील रूग्ण तसेच वैद्यकीय साहित्य वरच्या मजल्यांवर हलवण्यात आले. सुदैवाने रुग्णालयातील वरच्या मजल्यावर जागा असल्याने रुग्णांना दिलासा मिळाला आहे. पहाटे तीन ते चार तासात १२० मिलिमीटर पावसाची नोंद झाल्याची माहिती शिर्डी पालिकेचे प्रशासक तथा प्रांताधिकारी गोविंद शिंदे यांनी दिली आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in